❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २५६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# पार्थ पवारांना आरोपी का केलं नाही?

## मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी हायकोर्टाचा पोलीस महासंचालकांना सवाल

■ पुणे (दै. संध्या)

झपाट्याने वाढत असलेल्या पुणे शहरातील जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्याच, पुण्यातील बहुचर्चित आणि तब्बल 1800 कोटींच्या मुंढवा जमीन खरेदी प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल विधिमंडळात सादर केला होता. विकास खारगे समितीने तब्बल 4 हजार 392 पानांचा जंबो अहवाल सभागृहासमोर ठेवला. या अहवालात कुणालाही स्पष्टपणे क्लीन चीट देण्यात आलेली नसून, अनेक अधिकारी आणि संबंधितांवर कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. मात्र, पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख नसल्याने त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार कायम होती. आता, याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना सवाल केला आहे. पार्थ पवारांना आरोपी का केलं नाही, अशी विचारणा तपास अधिकाऱ्यांना केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांच्यावरील आरोपानंतर मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी समोर आलेल्या अहवालात थेट आरोपी म्हणून पार्थ पवार यांचे नाव नाही. त्यामुळे, एकप्रकारे पार्थ यांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता पार्थ यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण, मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी



पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, त्यांना का आरोपी केले नाही, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना केला. तसेच, पोलीस महासंचालकांसह तपास अधिकाऱ्यांनाही उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपिठाने हे आदेश दिले असून याप्रकरणी पुढील सुनावणी 28 सप्टेंबरला होणार आहे.

दरम्यान, खारगे समितीच्या अहवालात पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख करण्यात आलेला नाही. मात्र, भविष्यातील फौजदारी तपासात अधिक लोकांचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे समितीने नमूद केले आहे. पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवारांना आरोपी का करण्यात आले नाही? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना विचारला आहे. मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी झाली, त्यावेळी हायकोर्टाने पोलीस महासंचालकांसह, तपास अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यामुळे, खासदार पार्थ पवारांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील सुमारे 40 एकर जमीन या प्रकरणाच्या केंद्रस्थानी आहे. 1819 मध्ये ही जमीन महार वतन म्हणून देण्यात आली होती. नंतर 1957 मध्ये ती सरकारकडे आली आणि 1962 मध्ये भारतीय वनस्पती सर्वेक्षण केंद्रासाठी भाडेतत्त्वावर देण्यात आली. या जमिनीपैकी फक्त 3 एकरांवर केंद्राचे कामकाज होते, तर उर्वरित भाग जंगल स्वरूपात होता.

### तहसीलदार, दुय्यम निबंधकांवर बडतर्फीची कारवाई

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी विकास खारगे समितीने या प्रकरणी एकूण 7 बैठका घेतल्या असून, अहवालासाठी तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. या प्रकरणाशी संबंध असलेले तहसीलदार आणि सहायक दुय्यम निबंधक यांच्या बडतर्फीची शिफारस करण्यात आली आहे.

### विकास खारगे समितीच्या अहवालातील महत्त्वाचे निष्कर्ष


- शासकीय जमिनीचे नियमबाह्य हस्तांतरण करण्यासाठी खरेदी दस्त नोंदवण्यात आल्याची गंभीर बाब
- नोंदणी प्रक्रियेत महसूल, मुद्रांक व नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांची चूक
- उद्योग विभागाने एनओसीऐवजी इरादापत्र जोडणे ही नियमबाह्य कृती
- जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क न करता इरादापत्र देण्यात आले

# राज्यसेवा मुख्य परीक्षेतील गुणांच्या तफावतीची तक्रार; 'गुणपडताळणी'ची संधी

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षा 2025 च्या उमेदवारांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्य परीक्षेच्या गुणांमधील प्रचंड तफावतीबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर, आयोगाने उमेदवारांना गुणांच्या फेरपडताळणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. इच्छुक उमेदवारांना आयोगाने निश्चित केलेल्या ऑनलाईन प्रक्रियेद्वारे 10 सप्टेंबर 2026 पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. गुणपडताळणीनंतरची अंतिम परिस्थिती उमेदवारांच्या प्रोफाइलमध्ये थेट कळवली जाईल, असं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पष्ट केलं आहे.

एमपीएससीने 25 ऑगस्ट 2026 रोजी राज्यसेवा मुख्य परीक्षा 2025 च्या लेखी परीक्षेचा निकाल जाहीर केला होता. या निकालानंतर मुलाखतीसाठी अपात्र ठरलेल्या अनेक उमेदवारांच्या गुणांमध्ये अत्यंत धक्कादायक तफावत दिसून आली. मुख्य परीक्षेतील काही पेपर्समध्ये उमेदवारांना 250 पैकी अवघे 2,6,11,14 असे नगण्य गुण मिळाले होते. एका उमेदवाराला भाषा, निबंध आणि जीएसच्या सर्व पेपरमध्ये 100 पेक्षा जास्त गुण मिळालेले असताना, वैकल्पिक विषयाच्या एका पेपरमध्ये अवघे 2 गुण देण्यात आल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले. या प्रकारामुळे परीक्षेच्या पारदर्शकतेवर विद्यार्थ्यांनी तीव्र संशय व्यक्त करत एमपीएससीकडे लेखी




तक्रारी आणि पुरावे सादर केले होते. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर अखेर आयोगाने प्रसिद्धीपत्रक जारी करत गुणपडताळणीचा निर्णय घेतला आहे. एमपीएससीने गुणपडताळणीची संधी दिली असली तरी, परीक्षार्थी विद्यार्थ्यांमध्ये अजूनही असंतोष पाहायला मिळत आहे. आयोगाने उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन किंवा प्रत्यक्ष फेरतपासणी न करता केवळ 'गुणांची फेरपडताळणी' असे नमूद केले आहे. केवळ गुणांची बेरीज करून मूळ त्रुटी दूर होणार नाहीत. ज्या तज्ज्ञांनी किंवा तपासनिसांनी अशा प्रकारे 2 किंवा 6 गुण दिले आहेत, त्या उत्तरपत्रिकांची पारदर्शकपणे प्रत्यक्ष फेरतपासणी व्हावी, अशी मागणी स्पर्धा परीक्षा उमेदवारांकडून केली जात आहे. अर्ज पद्धत: उमेदवारांनी एमपीएससीच्या अधिकृत संकेतस्थळावरून आपल्या लॉगीन प्रोफाइलद्वारे विहित शुल्क भरून ऑनलाईन अर्ज करायचा आहे. गुणपडताळणीचा तपशील थेट उमेदवाराच्या प्रोफाइल डॅशबोर्डवर उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## थोडक्यात...

### पुणे रेल्वे मार्गावर मेगा ब्लॉक; गाड्यांना फटका?

पुणे : दैनिक संध्या

हडपसर-घोरपडी-पुणे तिसऱ्या रेल्वेमार्गाच्या कामासाठी १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान मोठा मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन इंटरलॉकिंगचे काम टप्प्याटप्प्याने होणार असल्याने पुणे, हडपसर आणि दौंड मार्गावरील रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. या ब्लॉकचा फटका पुणे-सोलापूर मार्गावरील काही महत्त्वाच्या गाड्यांनाही बसण्याची शक्यता असून, प्रवाशांच्या प्रवासाचे वेळापत्रक विस्कळीत होणार आहे. तिसऱ्या रेल्वेमार्गाच्या कामासाठी वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे या कालावधीत काही गाड्या रद्द करणे, काही गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये बदल करणे, तर काही गाड्या पुण्याऐवजी अन्य स्थानकांवरून सुरू अथवा समाप्त करण्याचे नियोजन केले जाण्याची शक्यता आहे. मेगा ब्लॉकदरम्यान एक्स्प्रेससह अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या मार्गात बदल होण्याची शक्यता आहे. काही गाड्या पुणे स्थानकापर्यंत न आणता हडपसर, दौंड किंवा अन्य स्थानकांवर शॉर्ट टर्मिनेट केल्या जाऊ शकतात. तसेच काही गाड्या पुण्याऐवजी अन्य स्थानकांवरून सुरू होण्याची शक्यता आहे.

### वरंधा घाटात एसटीला 'हिरवा कंदील' कधी?

पुणे : दैनिक संध्या

भोरमार्गे कोकणात जाणारा वरंधा घाट गेल्या आठ वर्षांपासून पावसाळ्यात आणि विशेषतः गणेशोत्सवाच्या काळात विविध कारणांमुळे वाहतुकीसाठी बंद राहत असल्याने कोकणवासीयांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच एसटी सेवा बंद असल्याने भोर, महाड, खेड, दापोली तसेच वरंधा-बिरवाडी परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, गणेशोत्सवापूर्वी एसटी सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे. भोर हद्दीत रस्ता रुंदीकरण व काँक्रीटीकरणाची कामे सुरू असल्याने एसटी वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. परिणामी प्रवाशांना नाइलाजाने खासगी वाहनांचा धोकादायक प्रवास करावा लागत आहे. यामुळे प्रवाशांचा आर्थिक भुर्दंड वाढत असून वेळेचीही मोठी नासाडी होत आहे. शिक्षण, आरोग्य, शासकीय कामे, बाजारहाट तसेच रोजगारासाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. महाड एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये ये-जा करणाऱ्या वाहनांचीही गैरसोय होत आहे. भोर तालुक्यातील हिर्डोशी भागातील निगुडघर ते वरंधा घाट परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. सध्या भोरची एसटी हिर्डोशीपर्यंत येत आहे. निगुडघर ते शिरगावदरम्यान सुमारे ७० टक्के काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून, एक-दोन पुलांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. धोकादायक ठिकाणी संरक्षण भिंती व इतर उपाययोजनांची काही कामे अद्याप अपूर्ण आहेत.

# कोल्हापूरच्या 'गोकुळ'ची निवडणूक जाहीर!

१८ ऑक्टोबरला मतदान तर १९ ला निकाल; सतेज पाटील विरुद्ध महायुती असा सामना

■ मुंबई (दै. संध्या)

पश्चिम महाराष्ट्राच्या सहकार आणि राजकीय वर्तुळात प्रचंड उत्सुकता लागून राहिलेल्या कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ' च्या पंचवार्षिक निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाला आहे. एकूण 25 संचालक पदांसाठी ही निवडणूक पार पडणार असून, 18 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान तर 19 ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत 5,331 मतदार (प्राथमिक दूध संस्था प्रतिनिधी) आपला मताधिकार बजावणार आहेत.

'गोकुळ' निवडणुकीचे संपूर्ण वेळापत्रक
उमेदवारी अर्ज विक्री व स्वीकृती:
15 सप्टेंबर ते 22 सप्टेंबर 2026
अर्जांची छाननी: 23 सप्टेंबर 2026
वैध अर्जांची यादी: 24 सप्टेंबर 2026
अर्ज माघारीची मुदत: 25 सप्टेंबर ते 8 ऑक्टोबर 2026
अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप: 8 ऑक्टोबर 2026 (माघारीच्या अंतिम दिवशी)
मतदान : 18 ऑक्टोबर 2026
मतमोजणी व निकाल: 19 ऑक्टोबर 2026

गेल्या निवडणुकीत काँग्रेस नेते सतेज पाटील (Satej Patil) यांनी जिल्ह्यातील सर्व विरोधकांना एकत्र आणून महादेवराव महाडिक यांची अनेक



वर्षांची एकछत्री सत्ता उलथवून लावली होती. मात्र, गेल्या 5 वर्षांत राज्यातील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे गोकुळमधील राजकीय समीकरणेही पूर्णपणे बदलली आहेत. गेल्या निवडणुकीत सतेज पाटलांसोबत असलेले मंत्री हसन मुश्रीफ, आमदार विनय कोरे, आमदार प्रकाश आबिटकर हे नेते आता महायुतीत आहेत. भाजप खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक यांच्यासह महायुतीच्या नेत्यांची मोठी फौज एकत्र आली आहे. खासदार धनंजय महाडिक यांनी गोकुळवर 25-0 असा विजय मिळवण्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, सतेज पाटील यांनीही जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यांनी हसन मुश्रीफ यांच्याविरोधात भूमिका घेणाऱ्या स्थानिक नेत्यांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे. गेल्या निवडणुकीत बाजी मारलेला सतेज पाटील गट आपली सत्ता कायम ठेवणार की महायुती गोकुळवर आपला झेंडा फडकवणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# श्री सोमेश्वर साखर कारखाना निवडणुक भाजपा स्वबळावर लढवणार

संपूर्ण पॅनेलसह सर्व जागा लढवण्याचा निर्णय शेतकरी,सभासद व कार्यकर्ता मेळाव्यात सर्वानुमते निर्णय

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड,सोमेश्वरनगरच्या पंचवार्षिक निवडणूक २०२६-२०३१ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) भव्य शेतकरी सभासद व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात कारखाना निवडणुकीसाठी संपूर्ण पॅनेल उभे करून सर्वच्या सर्व जागा पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्णय सर्वानुमते जाहीर करण्यात आला.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी चंदरअण्णा तावरे होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कारखान्याच्या आगामी निवडणुकीसंदर्भात शेतकरी, सभासद, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी आमदार संजय जगताप, माजी आमदार अशोक टेकवडे, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रंजन तावरे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप खैरे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष दिग्विजय काकडे, डॉ.नितीन सावंत यांच्यासह बारामती, पुरंदर, फलटण व खंडाळा परिसरातील भाजप मोर्चा, आघाडी व मंडल अध्यक्ष, शेतकरी सभासद आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कारखाना निवडणुकीच्या अनुषंगाने उपस्थित शेतकरी, सभासद व कार्यकर्त्यांचे म्हणणे




या सर्व चर्चेनंतर भारतीय जनता पार्टीचे पुणे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांनी श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक संपूर्ण पॅनेलच्या माध्यमातून लढविण्याचा निर्णय जाहीर केला.कारखाना निवडणुकीतील सर्वच्या सर्व जागा पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या निर्णयामुळे सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आगामी निवडणुकीत राजकीय वातावरण तापण्याची शक्यता निर्माण झाली असून,भाजपने निवडणुकीच्या मैदानात ताकदीने उतरण्याची तयारी सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे.आगामी काळात उमेदवारांची निवड,पॅनेलची घोषणा आणि निवडणुकीची प्रत्यक्ष रणनीती याकडे शेतकरी सभासदांचे लक्ष लागले आहे.सोमेश्वर कारखाना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा मेळावा भाजपच्या आगामी राजकीय रणनीतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

जाणून घेण्यात आले. तसेच आगामी निवडणुकीची दिशा, पॅनेलची रचना, उमेदवारांची निवड आणि निवडणूक रणनीती याबाबत प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली.

# ३ बालकांच्या मृत्यूप्रकरणी समितीचा अहवाल सादर

## अधिकारी दोषी, २ कंपन्या ब्लॅकलिस्टमध्ये; फायर अलार्म व स्प्रिंकलर यंत्रणा बंद

■ मुंबई (दै. संध्या)

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू विशेष काळजी कक्षात 24 ऑगस्ट 2026 रोजी लागलेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी अहवाल शासनास सादर झाल्यानंतर अहवालाच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. या दुर्घटनेत 36 बालकांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये सुरक्षित हलविण्यात आले होते. याप्रकरणी, अधिकारी दोषी आढळून आले आहेत, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून दोन कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे.

चौकशी समितीच्या अहवालानुसार व्हेंटिलेटरची वेळोवेळी आवश्यक देखभाल व दुरुस्ती न होणे, फायर अलार्म व स्प्रिंकलर यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर पंप हाऊस कुलूपबंद स्थितीत असणे तसेच उपकरणांच्या देखभाल व तांत्रिक तपासणीत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या प्रकरणी कामकाजातील हलगर्जीपणा, बेजबाबदार वर्तन, पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटी आणि अक्षम्य दुर्लक्ष यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही



प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभागातील दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत.

पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटींसाठी प्रथमदर्शनी जबाबदार ठरविण्यात आलेले उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला परिमंडळ; रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय अमरावती; अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती; प्रशासकीय अधिकारी आणि वीजतंत्री, स्त्री रुग्णालय अमरावती यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

चौकशी समितीच्या अहवालात मेसर्स/एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी ही कंपनी दोषी आढळल्याने तिला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शिलार कंपनीच्या सेवांमध्येही प्रथमदर्शनी दोष आढळून आल्याने फॉरेन्सिक अहवाल तातडीने प्राप्त करून संबंधित कंपनीलाही काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी सार्वजनिक बांधकाम, विद्युत, अग्निशमन, जैव-तांत्रिक आणि देखभाल-दुरुस्ती यंत्रणांच्या नियमित बैठका घेऊन रुग्णालयांच्या सुरक्षेचा आढावा घ्यावा, तसेच आवश्यक त्या उपाययोजनांवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांचे विद्युत व अग्निसुरक्षा ऑडिट तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक तसेच खासगी रुग्णालयांमध्ये फायर ऑडिटची अंमलबजावणी, देखरेख आणि अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या माध्यमातून सुनिश्चित करण्याच्या सूचनाही आरोग्य सेवा आयुक्तांना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, दुर्घटनेच्या वेळी आगीचा धोका निर्माण झालेल्या बालकांना तातडीने सुरक्षितस्थळी हलवून आपले कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातल्याबद्दल त्यांचा गौरव करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत.

**भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शासनाने राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळ देण्याचा निर्णय घेतला आहे. एसएनसीयु आणि एनआयसीयुमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे, तसेच सर्व रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा मॉक ड्रील अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अग्निसुरक्षा, विद्युत सुरक्षा आणि वैद्यकीय उपकरणांची देखभाल याबाबत मानक कार्यपद्धती (SOP) काटेकोरपणे लागू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.**

# जरांगे पाटलांचा सरनाईकांवर पलटवार

■ जालना(दै. संध्या)

उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनावर सरकारच्यावतीने मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. त्यानंतर, जरांगे पाटील यांनीही पत्रकारांशी संवाद साधत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांवर, मंत्र्यांवर जोरदार हल्लाबोल केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एकेरी भाषेत अपशब्द वापरल्यानंतर शिवसेना मंत्र्यांनीही जरांगे पाटील यांना इशारा दिला आहे. मंत्री भरत गोगावले आणि मंत्री प्रताप सरनाईक यांनी आम्ही देखील रस्त्यावर उतरू, असा इशारा दिला होता. त्यावर, आता जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांना लक्ष्य केलंय. रस्त्यावर उतर ये म्हणाव.. बस घेऊन... वळवळ केली तर रट्ट्याचे दिवस येतील, तुम्ही रट्ट्याची भाषा केली त्याला रट्ट्यानेच उत्तर मिळेल, असे जरांगे पाटील यांनी म्हटले. प्रताप सरनाईक तुमचे फडणवीस बद्दल काय मत आहे सर्वांना माहिती, यांना वाटतं मी महाविकास आघाडीला बोलावं, मी तुमचा नोकर आहे का? मी महाविकास आघाडीवर सत्तेत असताना त्यांच्या विरोधात बोलत होतो. तुम्ही जिथे सत्ता असेल तिकडेच जाणार आहात. तुम्ही एकनाथ शिंदेंना सोडून भाजपमध्ये जाणार, या सर्वांनी ठरवले आहे. ते थोड्या दिवसात फडणवीसांकडे दिसणार. हेच उद्या बोलतील, फडणवीस साहेबांना बोलू नका, एकनाथ शिंदेबद्दल बोला, असे म्हणत जरांगे पाटलांनी प्रताप सरनाईक यांच्यावर पलटवार केला.

# संपादकीय

## आजचा तरुण आणि कौशल्यविकसित भारत

### लोकसंख्येच्या लाभांशाचे सामर्थ्यात रूपांतर

***भारत हा जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेला देश आहे,ही केवळ सांख्यिकीय बाब नाही; ती इतिहासाने दिलेली एक विलक्षण संधी आहे.अनेक राष्ट्रांनी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बळावर विकास साधला,काहींनी तंत्रज्ञानाच्या जोरावर जागतिक नेतृत्व मिळवले. भारताकडे मात्र यापेक्षा वेगळी आणि अधिक मौल्यवान संपत्ती आहे-ती म्हणजे भारताची युवा शक्ती.ही शक्ती योग्य दिशेने घडवली, तर भारताला विकसित राष्ट्र होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही; परंतु तिचे योग्य संवर्धन झाले नाही,तर हाच लोकसंख्येचा लाभांश गमावण्याचा धोका आहे.***

आजचा प्रश्न तरुणांची संख्या किती आहे?हा नाही; तर त्या तरुणांकडे भविष्यातील जगाशी स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आहेत का?हा आहे. कारण एकविसाव्या शतकातील अर्थव्यवस्थेत पदवीपेक्षा क्षमता, प्रमाणपत्रापेक्षा कौशल्य आणि अनुभवापेक्षा सातत्याने शिकण्याची वृत्ती अधिक महत्त्वाची ठरत आहे.

गेल्या तीन दशकांत भारताने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय विस्तार केला. विद्यापीठांची संख्या वाढली,महाविद्यालयांचे जाळे विस्तारले आणि लाखो युवक-युवती उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आले.ही निश्चितच सकारात्मक बाब आहे.मात्र या विस्तारासोबत गुणवत्तेचा प्रश्नही अधिक ठळकपणे समोर आला. उद्योगक्षेत्र वारंवार सांगते की, उमेदवारांकडे शैक्षणिक पात्रता आहे; परंतु प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक कौशल्यांची कमतरता जाणवते. शिक्षण आणि रोजगार यांतील ही दरी केवळ रोजगाराचा प्रश्न नाही; ती विकासाच्या प्रक्रियेलाच प्रभावित करणारी बाब आहे.

याचे मूळ आपल्या शिक्षणपद्धतीत आहे.ज्ञानार्जनाला प्राधान्य देताना कौशल्य,नवोपक्रम,समस्या सोडविण्याची क्षमता, संवादकौशल्य,टीमवर्क आणि कार्यसंस्कृती यांसारख्या गुणांना अपेक्षित महत्त्व मिळाले नाही. शिक्षणाचे मूल्य गुणपत्रिकेपुरते मर्यादित राहिले तर कौशल्याचे मूल्य उद्योगांच्या दारात जाऊन उमगते ही परिस्थिती आहे.ही दरी जितक्या लवकर भरून काढली जाईल,तितकी भारताची विकासयात्रा अधिक वेगवान होईल.

दरम्यान,जगाचा रोजगार नकाशा झपाट्याने बदलत आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता,हरित ऊर्जा, रोबोटिक्स, सेमीकंडक्टर, ड्रोन,डिजिटल सेवा आणि प्रगत उत्पादन क्षेत्रे उद्याची अर्थव्यवस्था घडवत आहेत.अशा काळात शिक्षण एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया राहिलेली नाही; आयुष्यभर नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची तयारी हेच भविष्यातील यशाचे सूत्र ठरणार आहे.त्यामुळे कौशल्य विकास हा पर्याय नसून,बदलत्या काळाशी सुसंगत राहण्याची जीवनशैली आहे.

यासाठी शासनाने विविध स्तरांवर महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, स्किल इंडिया मिशन, प्रधानमंत्री कौशल विकास योजना, अप्रेंटिसशिप आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण यांसारख्या प्रयत्नांनी सकारात्मक दिशा दिली आहे.मात्र कोणतीही योजना तेव्हाच यशस्वी ठरते,जेव्हा ती शिक्षणसंस्था, उद्योग आणि समाज यांच्या सक्रिय सहभागातून प्रत्यक्षात उतरते. कौशल्य विकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती राष्ट्रीय भागीदारीची प्रक्रिया आहे.

शिक्षण संस्थांसमोरही नवी जबाबदारी उभी आहे. वर्गखोल्यांतील शिक्षण हे उद्योग, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवाशी जोडले गेले पाहिजे.विद्यार्थ्यांनी प्रकल्पाधारित शिक्षण,इंटर्नशिप, संशोधन,स्टार्टअप्स आणि उद्योजकतेकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे युवक घडविणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे.

यासोबतच समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन आवश्यक आहे.कौशल्याधारित शिक्षण म्हणजे केवळ हाताचे काम,असा गैरसमज अजूनही अनेक ठिकाणी आढळतो. प्रत्यक्षात कौशल्य म्हणजे बुद्धिमत्ता,सर्जनशीलता आणि कार्यक्षमतेचा संगम आहे. ज्या समाजाने श्रमाला प्रतिष्ठा दिली, त्यानेच आर्थिक समृद्धीचा मार्ग खुला केला.भारतालाही ही मूल्यदृष्टी अधिक दृढ करावी लागेल.

आजचा भारतीय तरुण हा केवळ नोकरीसाठी इच्छुक नाही; तर तो संशोधक आहे, उद्योजक आहे, तंत्रज्ञ आहे,नवोन्मेषक आहे आणि उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे. त्याच्या ऊर्जेला योग्य दिशा मिळाली,तर भारताचा लोकसंख्येचा लाभांश हा जगासाठी आदर्श ठरू शकतो.

'विकसित भारत २०४७' ही केवळ शासनाची घोषणा नाही; ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.या प्रवासाचा पाया संसदेत किंवा मंत्रालयांत नाही,तर शाळा,महाविद्यालये, आयटीआय, पॉलिटेक्निक,इंजिनीरिंग प्रयोगशाळा, उद्योग आणि कौशल्य विकास केंद्रांमध्ये रचला जात आहे.तेथे घडणारा प्रत्येक कुशल युवक म्हणजे विकसित भारताच्या इमारतीतील एक भक्कम खांब आहे.

शेवटी,राष्ट्रनिर्मितीचा खरा पाया नैसर्गिक संसाधनांमध्ये नसतो; तो मानवी संसाधनांमध्ये असतो. पदवी,कौशल्य,मूल्ये आणि नवोन्मेष यांचा समतोल साधणारी युवा पिढी घडविणे हीच आज भारताची सर्वात मोठी राष्ट्रीय गरज आहे. लोकसंख्येचा लाभांश हा नियतीने दिलेला वारसा असतो; परंतु त्याचे सामर्थ्यात रूपांतर करणे ही राष्ट्राच्या दूरदृष्टीची खरी कसोटी असते.

# आत्माच्या नैसर्गिक शेतीशाळेला मणिपूर कृषी शिष्टमंडळाची भेट

■ बारामती (दै. संध्या)

तालुक्यातील मौजे वढाणे येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा पुणे यांच्यावतीने मका पिकाविषयी चौथ्या नैसर्गिक शेतीशाळा वर्गाला मणिपूर कृषी शिष्टमंडळानी भेट दिली. यावेळी मणिपूर राज्यातील कृषी विभागाच्या कृषी संचालक श्रीमती मृनालीनी माईबम, आत्माच्या राज्य समन्वयक श्रीमती निशा निछोंगजम, कृषी अधिकारी इंद्रजीत सिंग यांच्यासमवेत १२ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

या शेतीशाळेत मका पिकावरील लष्करी अळीचे एकात्मिक तसेच सेंद्रिय पद्धतीने नियंत्रण करणे या विषयावर कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प समन्वयक आशिष भोसले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी निमार्क तयार करून त्याची फवारणी तसेच पक्षी थांबे पिकांमध्ये उभे करून एकात्मिक पद्धतीने लष्करी अळीचे नियंत्रण कसे करावे याविषयी तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले.

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत स्थापित संकल्प शेतकरी बचत गट, वढाणे गटामार्फत उभारण्यात आलेल्या जैव संसाधन केंद्रास भेट दिली. संसाधन केंद्रामध्ये जैविक निविष्ठा कशा पद्धतीने बनवल्या जातात याविषयी सविस्तर माहिती घेतली. यामध्ये बिजामृत,जीवामृत,घन जीवामृत, दशपर्णी अर्क, निमार्क, ब्रह्मास्त्र, अग्निअस्त्र, ई एम सोल्युशन, वेस्ट डी कंपोजर कल्चर. आदी जैविक तसेच नैसर्गिक पद्धतीने बनवण्यात येणाऱ्या निविष्ठा यांचे प्रात्यक्षिक पाहिले. गटातील प्रगतशील शेतकरी संभाजी चौधरी यांच्या ड्रॅगन फ्रुट मध्ये आंतरपीक चमेली तसेच सूर्यफूल या पिकांची प्रक्षेत्र भेट केली.

तसेच शेतीशाळेच्या माध्यमातून गावामध्ये राबविण्यात आलेल्या चायनीज पद्धतीने लागवड मका प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला देखील भेट दिली. सदरील अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने गटांमार्फत तसेच सेंद्रिय शेती शाळेच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती घेतली.



शिष्टमंडळाने तालुक्यामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेअंतर्गत मौजे रुई या ठिकाणी वसंत चौधर यांच्या लाकडी तेल घाणा, प्रकल्पाची पाहणी केली. राष्ट्रीय तेलबिया प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या बारामती ॲग्रो स्टार शेतकरी उत्पादक कंपनीला शिष्टमंडळाने भेट देऊन तेलबिया प्रक्षेत्रांची पाहणी केली यामध्ये सूर्यफूल भुईमूग आदी पिकांच्या प्लॉटची पाहणी केली.

शिष्टमंडळासोबत महाराष्ट्र राज्याचे सेंद्रिय शेती विभागाचे राज्य समन्वयक गणेश तांबे, हवेली तालुक्याचे उप कृषी अधिकारी अमोल ढवळे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रसाद राऊत उपस्थित होते.

या दौऱ्याचे नियोजन बारामती तालुक्यातील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक विश्वजीत मगर, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक गणेश जाधव, सहायक कृषी अधिकारी अमोल लोणकर तसेच कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख धीरज शिंदे सर यांनी केले.

सदरील दौऱ्यात मणिपूरच्या शिष्टमंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील पीक पद्धतीचा सखोल अभ्यास केला. तालुक्यातील तेलबिया, फळपिके,फुलपिके, तृणधान्य, कडधान्य या सर्वच पिकांची लागवड पाहून शिष्टमंडळाने तालुक्यातील उपक्रमांचे कौतुक केले

# 'राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेची मर्यादा २ लाख रुपये करणार'



■ पुणे (दै. संध्या)

समाजातील विविध घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेची मर्यादा १ लाख रुपयांवरून २ लाख रुपये करण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी घोषणा मंत्री श्री. सावे यांनी यावेळी केली. भिवडी येथे राजे उमाजी नाईक यांच्या जन्मस्थळी त्यांच्या २३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन केल्या नंतर जाहीर कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार रामराव वडकुते, जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष दौलत शितोळे, कर्नाटकचे प्रसन्न नंदपुरी महास्वामी महाराज, माजी आमदार संजय जगताप, शहाजी बापू पाटील तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री श्री. सावे म्हणाले, राजे उमाजी नाईक यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून रामोशी, बेडर आणि वाल्मिकी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. समाजातील मुला-मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी इतर मागास बहुजन विकास विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे ७६ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून, त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

परदेशी शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या ७५ करण्यात आली असून, लवकरच १०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. राज्यातील ९८० आश्रमशाळांमध्ये सुमारे अडीच लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांना डिजिटल वर्ग, सौरऊर्जा, वॉशिंग मशीन यांसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आधार योजनेंतर्गत धनगर समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत असून, महाज्योतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करून देण्यात येत आहे. वनार्टीअंतर्गत सहा आणि इतर मागास बहुजन विकास विभागांतर्गत १४ आर्थिक विकास महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे.समाजातील युवक, महिला आणि उद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळामार्फत २५ टक्के बीज भांडवल योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज योजना राबविण्यात येत आहेत.

या योजनांचा अधिकाधिक लाभ घेऊन युवकांनी व महिलांनी उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन मंत्री श्री. सावे यांनी केले. गोपाळ समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रज्वलित केलेली स्वराज्याची ज्योत आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मनात ठेवून राजे उमाजी नाईक यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. समाज आणि मातृभूमीसाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. रामोशी समाजाला शौर्य आणि पराक्रमाची मोठी परंपरा असून, स्वराज्याच्या काळात हा समाज छत्रपती शिवाजी महाराजांसाठी डोळे आणि कान म्हणून कार्यरत होता. आजही सर्व समाजांनी एकजुटीने पुढे जाण्याची गरज आहे.राज्यातील सर्व समाजघटकांना समान न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, विविध समाजांच्या विकासासाठी आर्थिक विकास महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठीही योग्य तो न्याय देण्यात येईल. दिवे येथे उभारण्यात येणारे राजे उमाजी नाईक यांचे राष्ट्रीय स्मारक भव्य-दिव्य स्वरूपात साकारण्यात येईल, अशी ग्वाही श्री. भोसले यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेशातून राजे उमाजी नाईक यांच्या कार्याला अभिवादन केले. देशाच्या इतिहासात रामोशी समाजाचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे सांगून ते म्हणाले की, स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी या समाजाने जवळपास चारशे वर्षे परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष केला.

# जनगणना २०२७ साठी माहिती संकलित करण्याचे निर्देश




■ पुणे(दै. संध्या)

भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने विहित कुटुंब पत्रकाद्वारे माहिती संकलित करण्यासाठी केंद्र शासनाने जनगणना अधिकाऱ्यांना विविध बाबींवरील माहिती संकलित करण्याचे निर्देश दिले आहेत. जनगणना अधिनियम, १९४८ च्या कलम ८ मधील उपकलम (१) अन्वये हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

जनगणना अधिकारी नियुक्त करण्यात आलेल्या स्थानिक क्षेत्राच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व व्यक्तींना निर्धारित कुटुंब पत्रकातील प्रश्न विचारून माहिती संकलित करतील. यामध्ये व्यक्तीचे नाव, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, जन्मतारीख व वय, वैवाहिक स्थिती, विवाहावेळीचे वय, पती किंवा पत्नीचे नाव, घोषित राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाती/जमाती व जात यांचा समावेश आहे.

तसेच वडील व आईचा तपशील, दिव्यांगत्व, मातृभाषा व इतर अवगत भाषा, साक्षरता व डिजिटल साक्षरता, शैक्षणिक स्थिती, उच्चतम शैक्षणिक स्तर व शाखा/विषय, मागील वर्षातील कामाची स्थिती, आर्थिक कार्याची वर्गवारी, व्यवसाय, उद्योग-व्यापार-सेवेचे स्वरूप आणि कामगारांचा प्रवर्ग याबाबतही माहिती घेतली जाणार आहे.

अंशकालीन, निम-अंशकालीन तसेच काम न करणाऱ्या व्यक्तींसाठी बिनआर्थिक कार्य आणि कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध असल्याबाबतची माहिती संकलित केली जाईल. याशिवाय कामाच्या ठिकाणापर्यंतचा प्रवास, जन्मठिकाण, पूर्वीचे निवासस्थान, स्थलांतराचे कारण, शेवटच्या स्थलांतरानंतर गावात किंवा शहरात वास्तव्याचा कालावधी आणि कायमस्वरूपी निवासाचा पत्ता यांचीही नोंद केली जाणार आहे.

सध्या विवाहित, विधवा, घटस्फोटित आणि विभक्त महिलांसाठी सध्या हयात असलेल्या अपत्यांची संख्या व जीवित जन्म झालेल्या अपत्यांची संख्या, तसेच सध्या विवाहित महिलांसाठी मागील वर्षभरात जीवित जन्मलेल्या अपत्यांची संख्या विचारण्यात येणार आहे. जनगणना माहिती संकलनात कोविड-१९ लसीकरणाचे ठिकाण, बँक खात्यांची एकूण संख्या, उपलब्ध असल्यास मोबाइल क्रमांक, आधार क्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक, भारतीय पासपोर्टधारक असल्यास पासपोर्ट क्रमांक आणि वाहनचालक परवान्याची उपलब्धता याबाबतची माहितीही समाविष्ट करण्यात आली आहे.

हे निर्देश भारताचे महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी जारी केले आहेत.



# वास्तूंची जतन-संवर्धन कामे दर्जेदार करावीत

### विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

■ मुंबई (दै. संध्या)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई' अंतर्गत शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहांच्या जतन व संवर्धनाची कामे सुनियोजित, दर्जेदार आणि या वास्तूंच्या ऐतिहासिक महत्त्वाला साजेशी व्हावीत, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी सामाजिक न्याय विभागाने मंजूर केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या विशेष निधीच्या अनुषंगाने विधानसभा उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सोसायटीच्या माध्यमातून राज्यातील नऊ शैक्षणिक संस्था व दोन वसतिगृहाचे जतन व संवर्धनाच्या कामांचा व प्रशासकीय मान्यतेचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सह सचिव सो. ना. बागूल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सह सचिव पु. प्र. साबणे, वित्त विभागाच्या अवर सचिव शि. भा. भोगटे, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. वासुदेव गाडे व चंद्रशेखर कांबळे आदी उपस्थित होते. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले, प्रशासकीय मान्यता मिळालेली कामे नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत. ज्या कामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, त्या प्रस्तावांना प्राधान्याने मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर करावी.

# मोठ्या टॉक्सिक गोईटरमुळे श्वसनमार्गाला धोका

■ पुणे(दै. संध्या)

मोठ्या आकाराच्या टॉक्सिक मल्टिनोड्युलर गोईटर आणि दीर्घकाळापासून असलेल्या हायपरथायरॉईडीझममुळे त्रस्त असलेल्या ५४ वर्षीय महिलेवर मेडिकोव्हर हॉस्पिटल, भोसरी, पुणे येथे टोटल थायरॉइडेक्टॉमी शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. थायरॉईड ग्रंथीच्या वाढलेल्या आकारामुळे रुग्णेला श्रम करताना श्वास घेण्यास त्रास तसेच आवाजात बदल जाणवत होता.

सुनीता फाटंगरे या रुग्णेला दीर्घकाळापासून हायपरथायरॉईडीझम असून त्यांच्यावर अँटी-थायरॉईड औषधोपचार सुरू होते. मात्र, कालांतराने थायरॉईड ग्रंथीचा आकार वाढून मोठा मल्टिनोड्युलर गोईटर तयार झाला. त्यासोबत श्वास घेण्यास त्रास आणि आवाजात बदल अशी लक्षणे दिसू लागल्याने मेडिकोव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला.



डॉ. आशिष शहुराव बांगर, कन्सल्टंट - सर्जिकल ऑन्कोलॉजी, यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. शिरीष शेळके, कन्सल्टंट - ईएनटी यांच्या सहकार्याने ही गुंतागुंतीची केस हाताळण्यात आली. एंडोक्रायनॉलॉजी, क्रिटिकल केअर आणि ॲनेस्थेशिया विभागाच्या टीमनेही उपचार प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. गोईटरचा मोठा आकार आणि संभाव्य श्वसनमार्गाच्या अडथळ्याचा धोका लक्षात घेऊन शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णेची सर्वंकष तपासणी करण्यात आली.

# उद्याने, क्रीडांगणे, पुरेशी वहातुक व्यवस्था व गरजेचे रस्ते यांचा अभाव

■ पुणे (दै. संध्या)

विद्येचे माहेरघर, शैक्षणीक हब असलेल्या पुणे शहराचा विकास वेगाने होत असून वहातुक समस्यांना पावलो पावली सामोरे जातांना महानगराचा विकास सुनियोजित पद्धतीने आणि नगर नियोजन विभागाच्या निर्देशानुसार, टीपी व डीपी नुसार होत आहे का(?) याचा मागोवा घेणाऱ्या परिसंवादाचे आयोजन राजीव गांधी स्मारक समितीच्या वतीने करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ११ रोजी सकाळी साडेनऊ ते दुपारी एक या वेळेत पत्रकार संघ येथे हा परिसंवाद होणार आहे अशी माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सीओइपी'चे माजी प्रा. प्रताप रावळ, वास्तु विशारद मकरंद शेंडे, भोला वांजळे, आबा जगताप, संजय अभंग , नंद कुमार पापळ, अनिल धिमधिमे इ सदस्य उपस्थित होते. परिसंवादा बद्दल अधिक माहिती देताना तिवारी म्हणाले, राजीव गांधी स्मारक समिती शहराच्या विकासावर सातत्याने पाठपुरावा करत असते. प्रत्येक शहराचा विकास त्याच्या नैसर्गिक जडण - घडणी नुसार होणे आवश्यक असते. पुणे



शहराचा विकास नगर नियोजन विभागाने आखून दिलेल्या पद्धतीने होत आहे का? यूडीसीपीआर आणि एचसीएमटीआरनुसार यशस्वी ठरलेले विकासाचे मॉडेल पुणे शहर प्रशासन शहरात प्रत्यक्षात दाखवू शकते का? नैसर्गिक घटकांचा प्रभाव लक्षात घेऊन पर्यावरणपूरक पद्धतीने शहराच्या विकासाचे काम सुरू आहे का..?ंधकाम परवाने देण्याची सध्याची पद्धत नागरिकांसाठी आणि शहराच्या नियोजनासाठी व अंतर्गत वहातुकीस तारक, मारक वा अधिक उग्र ठरणार (?) अशा विविध बाजुंनी महत्त्वपूर्ण व ज्वलंत ठरणाऱ्या समस्या व धोके यावर या परिसंवादात चर्चा होणार आहे.क्रेडाईच्या अहवालानुसार शहरात सध्या 93 हजारांहून अधिक घरे विक्री अभावी पडून असल्याचे नमूद केले आहे, अशा परिस्थितीत पुण्याच्या वाढत्या शहरीकरणामुळे वाहतूक, पायाभूत सुविधा, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पर्यावरण, उंच इमारतींची बांधकामे आणि नागरी नियोजनासमोर निर्माण झालेली आव्हाने यावरही परिसंवादात विचारमंथन होणार आहे.महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नुकतेच शहरात 6 हजार कोटी चौरस फुटांची नवीन बांधकामे होणार असल्याचे नमूद केले आहे, असे मकरंद शेंडे यांनी सांगितले. तर शहराच्या विस्ताराने पुण्याच्या लोकसंख्ये ची घनता वाढणार असल्याच्या प्रश्नांकडे प्रा. रावळ यांनी लक्ष वेधले. या परिसंवादामध्ये माजी खासदार वंदना चव्हाण, माजी महापालिका आयुक्त महेश झगडे, पर्यावरण तज्ज्ञ सारंग यादवाडकर वास्तु विशारद मकरंद शेंडे, संग्राम खोपडे, पर्यावरण तज्ज्ञ प्राजक्ता दिवेकर, वास्तु विशारद शिरीष केंभावी, सुहास पटवर्धन आदि सहभागी होणार आहेत.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे

### दुचाकी वाहन क्रमांक आरक्षणासाठी फेसलेस सेवा सुरू

पुणे : दैनिक संध्या



प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक, पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करण्याची फेसलेस (ऑनलाईन) सेवा बुधवार दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून सुरू होणार आहे. ही सेवा पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात कार्यान्वित असून, कार्यालयामध्ये ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नाही. नागरिकांनी ही सेवा घरबसल्या https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावरून वापर करता येईल. फेसलेस सेवा कार्यान्वित असून, अर्जदार आधार लिंक मोबाईल क्रमांकाद्वारे ओटीपी घेऊन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. नव्याने सुरू होणाऱ्या 'एम एच ६१' मालिकेतील पसंतीचे नोंदणी क्रमांक अर्जदारांना आरक्षित करता येतील. असे प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये कळविले आहे.

### सिंहगड रोड, दत्तवाडी व मुंढवा वाहतूक विभागाअंतर्गत वाहतूक मार्गात बदल

पुणे : दैनिक संध्या

सिंहगड, दत्तवाडी व मुंढवा वाहतूक विभागाअंतर्गत वाहतूक मार्गात बदल करण्यात येणार असून त्याबाबत नागरिकांच्या काही सूचना असल्यास पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफिस, बंगला नंबर ६, एअरपोर्ट रोड, पुणे यांच्या कार्यालयात २१ सप्टेंबर पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. या बदलांतर्गत भूमकर चौक, सर्व्हिस रस्त्याने स्वामीनारायण मंदिराकडे जाणाऱ्या वाहनांना व स्वामीनारायण मंदिराकडून भुमकर चौकाकडे जाण्यासाठी मंदिराच्या डाव्या बाजूने जाणारा सेवा रस्त्यावर एकेरी मार्ग करण्यात येणार आहे. तसेच स्वामीनारायण मंदिराच्या समोरील बाजूस असलेला सेवा रस्ता जोडणाऱ्या पुलावर फक्त भुमकर चौकाकडून स्वामीनारायण मंदिराकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश राहील. स्वामीनारायण मंदिराकडून येणाऱ्या वाहनांना या पुलावर नो एन्ट्री करण्यात येत आहे. वाहनांनी मंदिराच्या डाव्या बाजूकडील सर्विस रोड एकेरी मार्गाचा वापर करून भूमकर चौकाकडे जावे. वाहनांना एकेरी मार्ग करण्यात येत आहे. दत्तवाडी वाहतूक विभागाअंतर्गत एस. पी. एम. पब्लिक इंग्लिश मीडियम स्कूल, सदाशिव पेठ समोरील रस्त्यावर ५० मीटर पी-१ व पी-२ पार्किंग करण्यात येणार आहे. तसेच मुंढवा वाहतूक विभाग अंतर्गत आर्मी गेट व मेरिट सूट येथील राईट टर्न बंद करण्यात येणार आहे, असे पोलीस उप-आयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी कळविले आहे.

### रोजगार महाकुंभ अंतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता कौशल्य व क्षमतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मंगळवार दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी महाकुंभ रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मिळावा यांच्या माध्यमातून विविध उद्योग कंपन्या व आस्थापनांवरे मधील रोजगाराच्या संधी योग्य होती ना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील प्रमुख रोजगार मेळावा केंद्रांमध्ये सीओईपी टेक्नॉलॉजीकल यूनिव्हर्सिटी, जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी,येरवडा, के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कर्वेनगर, ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च, येवलेवाडी, ज्ञानविलास कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, डुडुळगाव जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, हडपसर रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, पिंपरी चिंचवड यांचा समावेश आहे. तसेच जुन्नर येथे जयहिंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, मावळ येथील इंद्रायणी महाविद्यालय, इंदापूर येथील विठ्ठलराव थोरात खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दौंड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुळशी येथील डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, शिरूर येथील कौशल्य विकास केंद्र, एमआयडीसी रांजणगाव, खेड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बारामती येथील विद्याप्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि आंबेगाव येथील शासकीय पॉलीटेक्निक, अवसरी या ठिकाणी रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवार आणि www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळासह http://forms.gle/vbtzrokybbubt4em7 या लिंक वर नोंदणी करावी. मुलाखतीस येताना सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१, रास्ता पेठ, सरदार मुदलियार रोड,पुणे येथे प्रत्यक्ष अथवा ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे सु. रा. वराडे यांनी कळविले आहे.

### भरती परीक्षा सुधारणांसाठी १२ सप्टेंबरला पुण्यात सल्लामसलत

पुणे : दैनिक संध्या

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. या समितीच्या माध्यमातून भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करण्यात येत असून, पुणे विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा आणि विषयतज्ज्ञांशी थेट संवाद साधण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी पुण्यात सल्लामसलत आयोजित करण्यात आली आहे. पुणे हे राज्यातील स्पर्धा परीक्षा तयारीचे महत्त्वाचे केंद्र असल्याने, भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा सुचविण्यासाठी पुणे जिल्ह्यातील उमेदवारांचा प्रत्यक्ष सहभाग या सल्लामसलतीत महत्त्वाचा ठरणार आहे. हा संवाद कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. पुणे जिल्ह्यासह पुणे महसूल विभागातील संबंधित घटकांना या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. भरती परीक्षा प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी व उमेदवारांचे अनुभव, अडचणी, अपेक्षा आणि सुधारणा सूचना समिती जाणून घेणार आहे. प्रश्नपत्रिका व परीक्षा केंद्र व्यवस्थापन, परीक्षेची सुरक्षितता व विश्वासार्हता, तंत्रज्ञानाचा वापर, उमेदवारांशी संवाद, तक्रार निवारण आणि परीक्षा अनुभव यांसह भरती परीक्षा पद्धतीशी संबंधित विविध विषयांवर सूचना मांडता येणार आहेत. या सल्लामसलत प्रक्रियेच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे ५ व्या मजल्यावर स्वतंत्र समन्वय कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, विषयतज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटकांना आपल्या सूचना व अभिप्राय थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. इच्छुकांनी आपल्या सूचना व अभिप्राय गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ पर्यंत "Pune-ExamReformsTaskforce@maharashtra.gov.in" या ई-मेलवर पाठवावेत. प्राप्त सूचना आणि प्रत्यक्ष संवादासाठी आलेल्या विनंत्यांचा आढावा घेऊन शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी संबंधित व्यक्ती व संस्थांना चर्चेची वेळ कळविण्यात येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# अपयशी ठरलेल्या 'पीएमआरडीए'ला टाळे ठोकण्याची वेळ

**महानगर नियोजन समितीचा आरोप; चाकण-हिंजवडीतील वाहतूककोंडी, रखडलेला विकास आराखडा अन् पायाभूत सुविधांच्या अभावावरून टीका**

■ पुणे (दै. संध्या)



याभूत सुविधांच्या विकासात गेल्या १०-११ वर्षांत अपेक्षित प्रगती झालेली नाही. विकास आराखडा (डीपी), टीपी स्कीम, रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधा अद्यापही प्रलंबित आहेत. पुण्याच्या विकासासाठी सर्वच पातळ्यांवर अपयशी ठरलेल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कार्यपद्धतीवर आमचा आक्षेप असून, या अकार्यक्षम यंत्रणेला टाळे ठोकण्याची वेळ आली आहे, असा आरोप महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत भसे यांनी पत्रकार परिषदेत केला. प्रसंगी नागरी हक्क संस्थेचे सुधीरकाका कुलकर्णी व कायद्याचे अभ्यासक ॲड. उमेश तारे उपस्थित होते.

चाकण आणि हिंजवडी परिसरातील वाहतूककोंडी व पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवरून उद्योजकांनी केलेले आंदोलन हे या भागातील नियोजनाच्या गरजेचे निदर्शक आहे. शहरालगतच्या भागाचा सुनियोजित विकास करण्यासाठी 'पीएमआरडीए'ची स्थापना करण्यात आली. मात्र, विकास आराखडा आणि टीपी स्कीमबाबतची प्रगती तसेच पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेचा आढावा घेण्याची गरज आहे. बांधकाम परवानग्यांसोबत दीर्घकालीन पायाभूत सुविधांचे नियोजन आणि अंमलबजावणी यावर अधिक भर देण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. महानगर नियोजन समितीच्या घटनात्मक भूमिकेचा विचार करून पुढील नियोजन प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही त्यांनी केली.'पीएमआरडीए'चा विकास आराखड्यासह 'स्ट्रक्चरल प्लॅन'बाबत पुणे महानगर नियोजन समितीने न्यायालयात धाव घेतली आहे. आम्ही दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना विकास आराखडा रद्द करण्यासह स्ट्रक्चरल प्लॅनबाबत न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले आहे. वारंवार कर्तव्यात कसूर आणि विकासकामांमध्ये अपयशी ठरलेल्या 'पीएमआरडीए'चा विशेष नियोजन प्राधिकरणाचा (एसपीए) दर्जा, तसेच स्ट्रक्चरल प्लॅनचे अधिकार काढून घ्यावेत. बांधकाम परवानग्या आणि विकास आराखड्याबाबत नगररचना विभाग व जिल्हाधिकारी यांची भूमिका पूर्ववत करण्याबाबत शासनाने विचार करावा, तसेच संबंधित नियम व जबाबदाऱ्यांची पूर्तता झाली आहे की नाही, याची तपासणी करून आवश्यकतेनुसार निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे, असे ॲड. उमेश तारे यांनी सांगितले.'पीएमआरडीए'च्या मागील कामकाजाची कायदेशीर तपासणी करून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी वसंत भसे यांनी केली. चाकण-हिंजवडीतील वाहतूककोंडी, रखडलेला डीपी आणि पायाभूत सुविधांचे प्रश्न यामुळे पीएमआरडीएच्या कार्यपद्धतीचा फेरआढावा घेण्याची मागणी अधिक तीव्र झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. 'पीएमआरडीए'चे कामकाज सुनियोजित नाही, त्यामुळे एकूणच यंत्रणेत सावळा गोंधळ आहे. या व्यवस्थापनाचे संपूर्ण लक्ष हे बांधकाम परवानग्यांवर असून इतक्या वर्षात त्यांनी शहराच्या विकासाकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे 'पीएमआरडीए'ची स्थापना रद्द करुन सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यायला हवेत अशी मागणी आम्ही करत आहोत. या भोंगळ कारभाराबाबत आम्ही अनेकदा पत्रव्यवहार केला. मात्र त्यालाही संबंधित यंत्रणेकडून प्रतिसाद देण्यात आला नाही. विकास आराखडा बनवण्याच्या नावाखाली पैसे लाटण्याचे काम 'पीएमआरडीए'कडून सातत्याने होत आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यातील समन्वयाचा अभाव आणि कुरघोडीचे राजकारण यामुळे ही परिस्थिती ओढावली आहे.

## मुलांचा ढोल-ताशांच्या गजरात 'आपली दहिहंडी'चा उत्सव

■ पुणे (दै. संध्या)



पारंपरिक बँड चे मंगल स्वर... ढोल-ताशांचा गजर, गोविंदांच्या जयघोषाने दुमदुमलेले वातावरण आणि दहीहंडी फोडण्याची उत्सुकता... या उत्सवी वातावरणात विशेष मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद भावूक करणारा ठरला. समाजातील वंचित, दिव्यांग आणि विशेष मुलांनाही दहिहंडीचा आनंद घेता यावा, या उद्देशाने शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या वतीने 'आपली दहिहंडी' हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. सोमवार पेठेतील शाहिरी भवन गुरुकुलाच्या प्रांगणात झालेल्या या उपक्रमात धर्मवीर शंभूराजे अनाथाश्रमातील विशेष मुला-मुलींनी दहिहंडी फोडण्याचा आनंद घेतला.

यावेळी विशेष मुलांचे संगोपन करणाऱ्या मावशी शिवकन्या अमृत बेळगे यांचा 'स्व. प्राची प्रकाश काळे स्मरणार्थ माता यशोदा सन्मान' देऊन गौरव करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊनच्या अध्यक्ष डॉ. शुभदा जठार यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यानंतर गोविंदांनी दहीहंडी फोडली. बँडच्या तालावर विशेष मुलांनी मनसोक्त नृत्य करत आनंद व्यक्त केला. डॉ. मिलिंद भोई, बाळासाहेब पाटोळे, रुपाली देशपांडे, अरुणकुमार बाभुळगांवकर,होनराज मावळे, नंदिनी देवकर यावेळी उपस्थित होते.

आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, दहिहंडी हा केवळ उत्सव नसून आनंद वाटण्याची आणि समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेण्याची परंपरा आहे. वंचित आणि विशेष मुलांना या उत्सवाचा आनंद घेता यावा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, या उद्देशाने 'आपली दहिहंडी' मागील २४ वर्षे सातत्याने आयोजित केली जात आहे. दहिहंडी फोडल्यानंतर सहभागी मुलांसाठी सुग्रास पुरणपोळीचे भोजन आयोजित करण्यात आले. तसेच गोपाळकाल्याच्या निमित्ताने संबंधित संस्थेला शिधाही देण्यात आला. या उपक्रमाला श्री दैवज्ञ नामदेव शिंपी समाज, कसबा पेठ यांचे विशेष सहकार्य लाभले.

## कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुपने फोडली सुवर्णयुग तरुण मंडळाची दहीहंडी

■ पुणे (दै. संध्या)

बोल बजरंग बली की जय... च्या जयघोषात पुण्यासह महाराष्ट्रातील गोपाळ भक्तांसाठी प्रमुख आकर्षण असलेल्या बुधवार पेठेतील सुवर्णयुग तरुण मंडळाची दहीहंडी कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुप दहीहंडी संघाच्या गोविंदांनी ७ थर लावून फोडली. शनिवारी रात्री ९ वाजून २२ मिनीटांनी चौथ्या प्रयत्नात दहीहंडी फोडण्यात गोविंदांना यश आले. विराज कांबळे या गोविंदाने हंडी फोडली.

बेलबाग चौकाजवळ असलेल्या दहीहंडी उत्सवाच्या पारंपरिक जागेत जय गणेश प्रांगण येथे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, सचिन आखाडे, अमोल चव्हाण, तुषार रायकर, प्रतिक घोडके यांसह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. सुवर्णयुग तरुण मंडळाचा दहीहंडी उत्सव पाहण्याकरिता गोपाळ भक्तांनी मोठी गर्दी झाली होती. भव्य एलईडी स्क्रिनवरुन श्रीकृष्ण लीला दर्शन गोपाळभक्तांना झाले. कसबा पेठेतील राधेकृष्ण ग्रुप पथकातील गोविंदाने हंडी फोडताच गोपाळ भक्तांनी एकच जल्लोष केला. दहीहंडी संघाला रुपये ५१ हजार आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मच गया शोर... बोल बजरंग बली की जय... यांसारख्या पारंपरिक गाण्यांप्रमाणेच नव्या गाण्यांवर तरुणाईने ताल धरत गोपाळकाला व दहीहंडी उत्सव साजरा केला. सुरुवातीला सायंकाळी नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक ट्रस्टच्या वादकांनी पारंपरिक वाद्यवादन करुन उपस्थितांना ठेका धरायला लावला. पुण्यासह इतर शहरांतून गोविंदा पथके दहिहंडी फोडण्याकरीता आली होती, असे मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी सांगितले.



## ध्वनिप्रदूषण करणाऱ्या भोंग्यांविरुद्धही आवाज उठवावा!

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवातील 'डीजे' आणि ध्वनीप्रदूषणाचा विषय सध्या बराच चर्चेत आहे. हिंदु जनजागृती समिती गेल्या २४ वर्षांपासून 'उत्सवांमध्ये डीजे किंवा कर्णकर्कश ध्वनीवर्धक लावू नका' याविषयी प्रबोधन करत आहे. 'उत्सवांतील गैरप्रकार रोखा' अशी व्यापक प्रबोधनपर मोहिम राबवत आहे.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी काही वर्षांपूर्वी जसे 'गणेशमूर्तींचे नदीत विसर्जन केल्याने जलप्रदूषण होते', हा प्रचार करत नॅरेटिव्ह सेट केला होता. वर्षातील ३६५ दिवस नदी प्रदूषित होण्याला ज्या गंभीर गोष्टी कारणीभूत आहेत, त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून केवळ गणेशोत्सवतील १० दिवसांत प्रदूषण होते, म्हणून कृत्रिम हौदांची टूम चालू झाली. त्याच प्रकारे आता ध्वनिप्रदूषणाची टूम आली आहे. 'डीजे'मुळे गणेशोत्सवात होणारे ध्वनीप्रदूषण नक्कीच थांबायला हवे, पण वर्षभर ध्वनीप्रदूषण करणाऱ्या अन्य कारणांचा आपण विचार करणार आहोत कि नाही ? विद्यानंद बापट आणि पुरोगामी टोळी जी मागणी करत आहे, त्यांनी ध्वनीप्रदूषण करणारे मशिदींवरील भोंगे उतरवा, थर्टी फर्स्टच्या रात्रीचे कार्यक्रम, तसेच 'सनबर्न'सारखे मोठे म्युझिक इव्हेंट थांबवा, ही मागणी पण करणार आहेत का? केवळ गणेशोत्सवाला लक्ष्य करून हिंदु धर्मातील 'द्वैत-अद्वैत तत्त्वज्ञाना'ला 'बौद्धिक हस्तमैथुन' म्हणणे, सण-उत्सवांना 'लष्करे-उत्सव' म्हणणे, ही ध्वनीप्रदूषणाच्या सूत्राच्या आडून धर्मावर आघात करणारी तथाकथित पुरोगामी मानसिकता दिसून येते, याचा आम्ही निषेध करतो. भारतात संविधानाचे राज्य आहे, त्यामुळे ध्वनीप्रदूषणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अवश्य कारवाई व्हावी; मात्र



'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'च्या नावाखाली हिंदु धर्मावर टीका करणाऱ्यांवरही कायद्यानुसार कारवाई व्हायला हवी, अशी आम्ही मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

हिंदु जनजागृती समिती उत्सवाचे पावित्र्यरक्षण आणि धार्मिकता जपण्यासाठी मंडपांमध्ये जुगार खेळणे, दारू पिणे, दारूच्या नशेत अंगविक्षेप नृत्य करणे, श्री गणेश मंडपासमोर अश्लील गाणी लावणे, मंडपासमोर मद्यपान-धुम्रपान करणे, सक्तीने वर्गणी मागणे आदी गैरप्रकारांविरोधात दोन दशकांपासून जनजागृती करत आहे.

# 'आवर्तन' कथक नृत्याविष्काराने जिंकली उपस्थितांची मने

**'लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स'चा १६ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा; १२५ नृत्यांगनांचे सादरीकरण**

■ पुणे (दै. संध्या)



वय वर्ष सहा ते पन्नास वयोगटातील नृत्यांगना...चेहऱ्यावरील नेमक्या भावमुद्रा...विविध ताल, तराणे, रचना, बंदिशी...आणि त्यावर एकसारखी थिरकणारी घुंगरांची पावले...अशा सुंदर नृत्याविष्काराने सोमवारची संध्याकाळ रंगली होती. निमित्त होते 'लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स अँड मीडिया'च्या 'आवर्तन २०२६' कार्यक्रमाचे. संस्थेला १६ वर्ष पूर्ण झाली असल्याने वर्धापन दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात साजऱ्या झालेल्या या कार्यक्रमातील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रसिद्ध नृत्यांगना राधिका साठे यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लावली.

लयोमच्या संस्थापिका वेदांती भागवत महाडिक यांच्यासह त्यांच्या शिष्यांनी वैविध्यपूर्ण नृत्यरचना सादर करीत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कार्यक्रमाची सुरुवात १२० नृत्यांगनांच्या हातातील दिव्यांसोबत नमामि शमिशान या रुद्राष्टकमने झाली. यानंतर गणेश स्तुती, ताल तीनतालाचे सादरीकरण, विठ्ठलावरील 'देह विठ्ठल विठ्ठल झाला हे' भक्तीगीत, वेदांती यांनी सादर केलेले शिवगौरी नृत्य, ताल धमार, बंदिशीवरील फ्यूजन अशी एकाहून एक उत्तम सादरीकरण करत विद्यार्थिनींनी उपस्थितांची मने जिंकली. तसेच प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या गायनातील अमूल्य अशा योगदानाबद्दल आदरांजली वाहण्यात आली. त्यांनी गायिलेल्या 'निगाहे मिलाने को जी चाहता है...' आणि 'झुमका गिरा रे' या गीतांवर विद्यार्थिनींनी उत्तम सादरीकरण केले. अभिनय आणि तालाची सुरेख सांगड घातलेल्या रुक्मिणी स्वयंवरने कार्यक्रमाची सांगता झाली.

राधिका साठे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना वेदांती आणि त्यांच्या विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले. पं राजेंद्र गंगाणी हे वेदांती आणि आपले गुरू असल्याने आपण गुरूभगिनी असल्याचाही उल्लेख त्यांनी यावेळी आवर्जून केला. आजच्या काळात कलेचे अधिष्ठान असणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. कला कोणत्याही वयातील व्यक्तीला निश्चितच आनंद देते. कला शिकणारी प्रत्येक विद्यार्थिनी त्यात पुढे खूप मोठे काही करेलच असे नाही. पण ती कला शिकत असताना कलेचा, जगण्याचा, शिस्तीचा संस्कार देणे हे गुरू म्हणून आमचे काम असल्याचे त्या म्हणाल्या.

'आवर्तन २०२६' चा 'स्टुडंटस ऑफ द इयर' हा पुरस्कार तनिष्का कुलकर्णी या विद्यार्थिनीला वर्षभरातील उत्तम कामगिरीबद्दल देण्यात आला. तसेच वेदांती यांनी लिहीलेल्या 'कथक शास्त्र' पुस्तकातील आरेखनाचे काम करणाऱ्या शेखर डेरे, छायाचित्रे आणि सौंदर्य विभाग किमया बेलोसे, सहाय्यक लेखिका ईशा कुलकर्णी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

पुस्तकाविषयी सांगताना वेदांती म्हणाल्या, "कथकच्या परीक्षांचा अभ्यास करणे विद्यार्थिनींना सोपे व्हावे यासाठी 'कथक शास्त्र' हे पुस्तक लिहीले आहे. आता पहिल्या तीन परीक्षांसाठी असलेले हे पुस्तक मराठी, इंग्रजी आणि हिंदी अशा तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे. शालेय अभ्यास करत असताना नृत्याच्या परीक्षांचा अभ्यास करणे सोपे व्हावे याच उद्देशाने पुस्तकाची निर्मिती केली असून लवकरच भाग २ ही करण्याचा विचार आहे". कार्यक्रमाची प्रकाशयोजना ओंकार हजारे यांनी तर ध्वनीसंयोजन राजेंद्र बोरावके यांनी केले होते. सूत्रसंचालन वरदा भिडे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



## जेव्हा डकार चॅम्पियन मुंबईत मोटरसायकलवरून येतो

**पुणे : दैनिक संध्या**

मुंबईबाहेर बाइकवरून जाण्याची मजाच काही वेगळी असते. हळूहळू ट्रॅफिक आणि काँक्रीटच्या इमारती मागे पडतात, शहरातील गजबज कमी होते आणि रस्त्यांचे स्वरूप बदलू लागते. काही वेळातच वीकेंड राइडचे रूपांतर पश्चिम घाटातील प्रवासात होते. पुढच्या वळणावर कधी गुळगुळीत रस्ता, कधी खराब रस्ता, तर कधी एखादी ट्रेल तुमची वाट पाहत असते. अशा प्रकारे सतत बदलत जाणारा परिसर ॲडव्हेंचर रायडर्सना आकर्षित करतो. पण जगातील सर्वात खडतर रॅली मार्गांवर राइड केलेली व्यक्तीच पुढे येणाऱ्या आव्हानांचा सामना कसा करायचा हे तुम्हाला सांगणार असेल तर? मुंबईतील रायडर्सना याचाच अनुभव या सप्टेंबरमध्ये घेता येणार आहे. KTM ADVENTURE RALLY EXTREME चा भाग म्हणून 2018च्या डकार रॅलीचा विजेता मॅथियस वॉकनर मुंबईत येणार आहे. मॅथियस वॉकनरने अनेक वर्षे अत्यंत आव्हानात्मक मार्गांवर राइड केली आहे. 1978पासून आयोजित करण्यात येणाऱ्या डकार रॅलीमध्ये रायडर्स आणि मोटरसायकल्सना हजारो किलोमीटरचे वाळवंट आणि खडतर भूप्रदेश पार करावा लागतो. अनेकदा त्यांना मार्ग दाखवण्यासाठी केवळ रोडबुकचा आधार असतो. ओळखीच्या खुणांच्या आधारे मार्ग शोधण्याची सोय नसते आणि पुढचा मार्ग रायडर किंवा बाइकसाठी सोपा असेल याचीही कोणतीही खात्री नसते. अर्थातच, डकारमधील अनेक अनुभव त्याच्याकडून ऐकायला मिळतील. रेसिंग, खडतर टप्पे आणि सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करताना आलेल्या प्रसंगांच्या अनेक गोष्टी असतील. पण ॲडव्हेंचर रायडरसाठी कदाचित याहीपेक्षा महत्त्वाचे असेल ते अशा मोठ्या प्रसंगांच्या दरम्यान काय घडते हे समजून घेणे. भूप्रदेश कसा समजून घ्यायचा, अडचण आली तर शांत कसे राहायचे, थकवा कसा हाताळायचा आणि मदत मिळण्याची शक्यता नसलेल्या ठिकाणी मोटरसायकल पडली किंवा दुरुस्तीची गरज भासली तर काय करायचे, याचे मार्गदर्शन त्याच्याकडून मिळणार आहे.



## पुण्याच्या वाढत्या बांधकामांवरून शहर नियोजनाचा प्रश्न ऐरणीवर

**पुणे : दैनिक संध्या**

विद्येचे माहेरघर आणि शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना वाहतूक कोंडी, पायाभूत सुविधांचा अभाव, पर्यावरणाचा ऱ्हास आणि वाढत्या उंच इमारतींच्या बांधकामामुळे शहराचा विकास खरोखरच सुनियोजित पद्धतीने होत आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याच्या विकासाचे वास्तव आणि भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्यासाठी राजीव गांधी स्मारक समितीच्या वतीने शुक्रवारी (दि. ११) एकदिवसीय चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार भवन, नवी पेठ येथे सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत हा परिसंवाद होणार आहे. याबाबतची माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी सीओईपीचे माजी प्राध्यापक प्रताप रावळ, वास्तुविशारद मकरंद शेंडे, भोला वांजळे, आबा जगताप, संजय अभंग, नंदकुमार पापळ, अनिल धिमधिमे आदी उपस्थित होते.

### झी५ आता नव्या रूपात

# भारतातील स्ट्रीमिंग अनुभवाला नवी दिशा

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

प्रेक्षकांना पूर्वीपेक्षा अधिक मनोरंजनाचे पर्याय उपलब्ध होत असताना, मनोरंजन शोधण्याचा आणि त्याचा आनंद घेण्याचा अनुभव झी5कडून नव्याने घडवण्यात येत आहे. कंटेंटच्या वाढत्या पर्यायांना आणखी बळ देत झी5ने आतापर्यंतच्या सर्वांत महत्त्वाच्या बदलांपैकी एक बदल सादर केला आहे. मोबाइल आणि कनेक्टेड टीव्हीवरील अनुभव पूर्णपणे नव्या आणि दमदार रूपात सादर करण्यात आला असून, अधिक स्मार्ट पर्सनलायझेशन, एआयच्या मदतीने कंटेंट शोधण्याची सुविधा, अधिक आकर्षक व्हिज्युअल नॅव्हिगेशन आणि वेगवेगळ्या स्क्रीनवर सहजपणे वापरता येणारा अनुभव ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. प्रेक्षकांच्या कंटेंट पाहण्याच्या सवयी लक्षात घेऊन नव्या झी5वर प्रीमियम एंटरटेनमेंट, फ्री5, किड्झी, टीव्ही आणि स्पोर्ट्स अशा पाच स्वतंत्र विभागांमध्ये कंटेंट उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या आवडीचा कंटेंट शोधणे अधिक सहज, आकर्षक आणि सोपे होणार आहे. भारतातील प्रेक्षकांच्या कंटेंट पाहण्याच्या सवयी बदलत आहेत आणि त्यानुसार मनोरंजन शोधण्याचा अनुभवही बदलत आहे. पर्सनलायझेशन हा घटक नव्या अनुभवाच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे प्रेक्षकांना त्यांच्या आवडीनुसार सर्वाधिक




योग्य कंटेंट सहज शोधता येणार आहे. त्यासोबतच एआय सुविधेमुळे प्लॅटफॉर्मवर कंटेंट अधिक स्मार्ट पद्धतीने शोधता येणार असून, त्याचा वापरही अधिक सहज होणार आहे. मोबाइलसोबतच कनेक्टेड डिव्हाइसवर मनोरंजन पाहणाऱ्या प्रेक्षकांची संख्या वाढत असल्यामुळे छोट्या आणि मोठ्या स्क्रीनदरम्यान सहजपणे वापरता येईल अशा प्रकारे हा नवा अनुभव तयार करण्यात आला आहे. प्रेक्षकांच्या सोयीसाठी पुढील पिढीतील एआयवर आधारित कस्टमर सपोर्ट असिस्टंटची सुविधाही देण्यात आली आहे. सबस्क्रिप्शन, प्लेबॅक, ॲक्सेस, कंटेंट आणि डिव्हाइसशी संबंधित समस्यांवर या सुविधेच्या माध्यमातून अधिक स्मार्ट पद्धतीने आणि जवळपास त्वरित तोडगा मिळू शकणार आहे. या सुविधांसोबतच डेटा प्रायव्हसी अधिक मजबूत करण्यासाठीही झी5कडून प्रगत उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी या क्षेत्रातील सर्वोत्तम आणि आघाडीच्या सुरक्षा उपायांचा आधार घेण्यात आला आहे. या सर्व नव्या सुविधा एकत्रितपणे अधिक वेगवान, स्मार्ट आणि सहज मनोरंजन अनुभवाचा नवा मापदंड निर्माण करतात.

नवा अनुभव तयार करताना भारतातील प्रेक्षक मनोरंजन कसे पाहतात, कंटेंट कसा शोधतात आणि त्याचा कशा प्रकारे आनंद घेतात, हे समजून घेण्यासाठी झी5ने अधिक सखोल अभ्यास केला. सध्याच्या ॲपबाबत मिळालेला अभिप्राय, विविध बाजारपेठांमधील ग्राहकांचा अभ्यास आणि फोकस ग्रुपमधील चर्चा यांच्या आधारे मोबाइल आणि कनेक्टेड टीव्हीवर प्रेक्षकांचा कंटेंट पाहण्याचा संपूर्ण प्रवास समजून घेण्यात आला. मोठ्या स्क्रीनवरील समृद्ध आणि गुंतवून ठेवणाऱ्या अनुभवाशी तडजोड न करता अधिक सोपा आणि सहज वापरता येणारा अनुभव देण्याची गरज या संशोधनातून अधोरेखित झाली. या निष्कर्षांच्या आधारे प्लॅटफॉर्मची नव्याने रचना करण्यात आली. तसेच लॉन्चपूर्वी प्लॅटफॉर्मच्या प्रत्येक बाबीची काटेकोर तपासणी करून त्यात आवश्यक सुधारणा करण्यासाठी व्यापक बगॅथॉन्स घेण्यात आले. यामध्ये प्रॉडक्ट, इंजिनीअरिंग, क्वालिटी ॲश्युरन्स आणि डिझाइन क्षेत्रातील तज्ज्ञांनी एकत्रितपणे काम केले.

## AM/NS इंडियाने 'पेलिकन' स्टील ब्रँड केला प्रस्तुत

■ मुंबई (दै. संध्या)

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) ने आज AM/NS पेलिकन या प्रीमियम गॅल्वनाइज्ड स्टील ब्रँडची सुरुवात केली असून भारताच्या बांधकाम, पायाभूत सुविधा, उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी हा ब्रँड तयार करण्यात आला आहे. या नव्या ब्रँडमुळे कंपनीच्या विशेष उत्पादनांची श्रेणी अधिक मजबूत झाली असून ग्राहकांच्या गरजांनुसार उत्तम दर्जाची उत्पादने तयार करण्यावर कंपनीचा भर दिसून येतो. पायाभूत सुविधांचा विकास, औद्योगिक विस्तार आणि बांधकाम व उत्पादन क्षेत्रात टिकाऊ तसेच कमी देखभालीच्या साहित्याला मिळणारी वाढती पसंती यामुळे गंज-रोधक स्टील उत्पादनांची मागणी वाढत आहे, अशा काळात ही सुरुवात झाली आहे. सन 2025 या वर्षात भारतातील गॅल्वनाइज्ड स्टीलची एकूण बाजारपेठ / मागणी सुमारे 7.65 दशलक्ष मेट्रिक टन असण्याचा अंदाज आहे गॅल्वनाइज्ड स्टीलवर एक संरक्षक थर असतो जो त्याला गंज आणि झिजण्यापासून वाचवण्यास मदत करतो. ग्राहकांना उत्तम गंज संरक्षण, सातत्यपूर्ण दर्जा आणि दीर्घ आयुष्य देण्यासाठी AM/NS पेलिकन तयार करण्यात आले आहे. याचे उत्कृष्ट गंज संरक्षण, एकसमान कोटिंग दर्जा आणि



सुलभ आकार घेण्याची क्षमता यामुळे हे टिकाऊपणा, देखावा आणि निर्मितीची सुलभता महत्त्वाची असलेल्या कामांसाठी योग्य ठरते. हे उत्पादन छत आणि छताचे आधारभूत भाग, पाईप्स, एअर-कंडिशनिंग आणि व्हेंटिलेशन सिस्टीम, केबल ट्रे, कुंपण, फर्निचर, ड्रम आणि बॅरल्स आणि इतर सामान्य अभियांत्रिकी कामांसारख्या विविध गोष्टींसाठी वापरले जाऊ शकते. पेलिकनची निर्मिती AM/NS इंडियाच्या प्रगत गॅल्वनायझिंग क्षमतेचा वापर करून केली जाईल आणि ते कंपनीच्या भारतातील विस्तृत वितरण आणि ग्राहक नेटवर्कद्वारे उपलब्ध करून दिले जाईल. AM/NS इंडियाचे संचालक आणि विक्री व विपणन उपाध्यक्ष रंजन धर म्हणाले: "भारतीय ग्राहकांना आता विशिष्ट वापर आणि कामगिरीच्या गरजेनुसार तयार केलेल्या स्टील पर्यायांची अधिक गरज भासत आहे. AM/NS पेलिकन हा एक उच्च-दर्जाचा गॅल्वनाइज्ड स्टील पर्याय देतो जो विश्वासार्ह गंज संरक्षणासोबत सातत्यपूर्ण दर्जा आणि कामगिरी सुद्धा देतो.

## 'पूर्वेकडील ऑक्सफर्ड'मध्ये ऑनलाइन पदवीला वाढती पसंती

■ पुणे (दै. संध्या)



'पूर्वेकडील ऑक्सफर्ड' अशी ओळख असलेल्या पुण्याचे पारंपरिक कॅम्पस शिक्षणातील महत्त्व कायम असतानाच, ऑनलाइन पदवी शिक्षणाकडेही तरुणांचा कल वेगाने वाढत असल्याचे दिसून आले आहे. कॉलेज विद्या प्लॅटफॉर्मच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील एकूण ऑनलाइन प्रवेशांमध्ये पुण्याचा वाटा १३.२० टक्के असून, १९.५२ टक्के वाट्यासह मुंबईनंतर पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातील ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वयोगटातील बदलही विशेष लक्षवेधी आहेत. जवळपास चारपैकी तीन विद्यार्थी २६ वर्षांखालील आहेत. त्याच वेळी, तीनपैकी जवळपास दोन विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी ऑनलाइन अभ्यासक्रमाची निवड करीत आहेत. विशेषतः २१ ते २५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा वाटा २०२३-२४ मधील ४०.७४ टक्क्यांवरून २०२५-२६ मध्ये ५७.१४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याउलट, २६ ते ३० वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा वाटा ३१.६१ टक्क्यांवरून १५.२२ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. या आकडेवारीवरून शिक्षण पूर्ण करून काही वर्षांनी ऑनलाइन पदवी घेण्याऐवजी, तरुण विद्यार्थी आपल्या करिअरच्या सुरुवातीपासूनच अतिरिक्त किंवा पर्यायी पात्रतेचा विचार करू लागल्याचे स्पष्ट होते.


## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : १०/०९/२०२६ ०२:०० दुपारी ते दिनांक १९/०९/२०२६ दुपारी २.०० दुपारी पर्यंत

स्वीकृती दिनांक : १०/०९/२०२६ ०२:३० दुपारी ते दिनांक १९/०९/२०२६ दुपारी २.३० दुपारी पर्यंत — तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २१/०९/२०२६ दुपारी ३.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/414 | पाणीपुरवठा | प्र. क्र. १३ अ मध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या खराब झालेल्या पाईप लाईन बदलणे व नवीन टाकणे. | रू. ४१५/- | रू. ८४७२०५/- | रू. ८४७२/- | ४ | शाहू पोकळे ९६८९९३७९१० |
| PMC/WATER_SUPPLY/2026/415 | पाणीपुरवठा | प्र. क्र. १३ ड मध्ये ताडीवाला रोड मारूती मंदिर परिसरात नवीन पाण्याची लाईन टाकणे. | रू. ४१५/- | रू. ८४७४०८/- | रू. ८४७४/- | ४ | शाहू पोकळे ९६८९९३७९१० |
| PMC/WATER_SUPPLY/2026/416 | पाणीपुरवठा | प्र. क्र. १३ ड मध्ये प्रायव्हेट रोड परिसरात नवीन पाण्याची लाईन टाकणे. | रू. ४१५/- | रू. ८४७१८१/- | रू. ८४७२/- | ४ | शाहू पोकळे ९६८९९३७९१० |
| PMC/WATER_SUPPLY/2026/417 | पाणीपुरवठा | प्र. क्र. १३ ब मध्ये ताडीवाला रोड परिसरात नवीन पाण्याची लाईन टाकणे. | रू. ४१५/- | रू. ८४६४२२/- | रू. ८४६४/- | ४ | शाहू पोकळे ९६८९९३७९१० |
| PMC/WATER_SUPPLY/2026/418 | पाणीपुरवठा | प्र. क्र. १३ ड मध्ये ताडीवाला रोड विश्वदीप मंडळ परिसरात नवीन पाण्याची लाईन टाकणे. | रू. ४१५/- | रू. ८४७३५५/- | रू. ८४७४/- | ४ | शाहू पोकळे ९६८९९३७९१० |

ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
राजेश शिंदे
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्रमांक : १/७६५ दि. ०९/०९/२०२६*


## 'द वर्ल्ड इज आवर्स' कलेक्शनचे लॉन्च

■ पुणे (दै. संध्या)




अभिनेत्री आलिया भट्ट यांनी सुरू केलेल्या मुलांच्या इको-फ्रेंडली ब्रँड 'एड-अ-मम्मा' (Ed-a-Mamma) ने 'द वर्ल्ड इज आवर्स' (The World Is Ours) हे ऑटम विंटर २०२६ चे नवीन कलेक्शन सादर केले आहे. लहान मुले जगाकडे ज्या उत्सुकतेने पाहतात, अनुभवतात आणि आपल्या कल्पनाशक्तीतून त्याचा अर्थ लावतात, त्यातून प्रेरणा घेऊन हे कलेक्शन साकारण्यात आले आहे. ० ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी तयार करण्यात आलेल्या या कलेक्शनमध्ये मजेशीर कथा, पर्यावरणपूरक रचना आणि विचारपूर्वक केलेल्या डिझाइनचा मिलाफ आहे. बालपणातील विविध टप्प्यांनुसार कपड्यांच्या डिझाइनमध्ये वेगवेगळ्या कल्पना आणि बारकावे समाविष्ट करण्यात आले आहेत. ० ते ४ वर्षे वयोगटासाठी कलेक्शनमध्ये प्राणी आणि निसर्गावर आधारित आकर्षक प्रिंट्सचा वापर करण्यात आला आहे. दैनंदिन वापरातील कपड्यांमध्ये मुलांच्या हालचाली लक्षात घेऊन व्यावहारिक वैशिष्ट्ये जोडण्यात आली आहेत. जोगर्सवरील मऊ 'नी पॅचेस'मुळे रांगताना, चालायला शिकताना किंवा खेळताना लहान मुलांना अधिक आराम मिळतो. ५ ते १४ वर्षे वयोगटासाठी मुलांचे विकसित होत जाणारे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या आवडीनिवडी आणि सक्रिय जीवनशैली यांचा विचार करण्यात आला आहे.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव आगर, ता. जुन्नर, जि. पुणे. येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे अशिल यांनी सांगितलेवरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

गाव आगर ता. जुन्नर, जि. पुणे येथील खाते क्र. १२० वरील जमीन गट नं. ४७/२ मधील क्षेत्र ४ हे ८७ आर, पो.ख ० हे २४ आर, आकार ९ रु ४४ पैसे ही मिळकती पैकी खाते क्र. १२० वरील गट नं. ४७/२ पैकी १ हे ७७.७५ आर पो. ख ०.१२ आर, आकार ३ रु ३५ पैसे या जमिनी पैकी दिलीप बबन महाबरे, विलास बबन महाबरे व श्रीमती. शैला रोहिदास काशिद यांचे मालकीची जुन्नर धामणखेल डांबरी रस्त्यालगतची बागायत शेतजमिन (विक्री केलेल्या क्षेत्रामधून विहिरीचे क्षेत्र सोडून उर्वरित व जाणे-येण्यासाठी रस्ता सोडून ०.११ आर क्षेत्र) गट नं.४७/२ पैकी ० हे ११ आर, आकार ० रू २२ पैसे यांसी चतुः सिमा पुर्वेस- गट नं.४७/२ पैकी लुकेश भिमसिंग खोत यांचे खाते नं. ५३६ वरील ० हे ११ आर क्षेत्र, दक्षिण- गट नं. ४७/२ पैकी योगेश निवृत्ती महाबरे व इतर यांचे खाते क्र. ९१ वरील क्षेत्र पश्चिम जुन्नर धामणखेल डांबरी रस्ता, उत्तर गट नं.४७/२ पैकी, लुकेश भिमसिंग खाते यांचे खाते क्र. ५३६ वरील ० हे ११ आर क्षेत्र. सदरहू मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिल यांच्याबरोबर करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही, बक्षीस, गहान, दान, लिज, पोटगी, चोळी, बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क खरेदी संदर्भात वाद, चतुः सिमाबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंन्दू कायदयाप्रमाणे अथवा प्रचलित पथे प्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीव पुर्वक सोडून दिलेले आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कोणाचेही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ता. ०७/०९/२०२६.

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मु.पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. ९७३०८२८७२१.
ऑफिस-हिंन्दू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
व्यापारी संकुल, दुसरा मजला,
गाळा नं.१९, धान्य बाजार पेठ,
जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.

## जाहीर प्रसिध्दी

तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनाम वर्ग ६ब) मिळकतीची हया श्री. उल्हास नामदेव नवले रा. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे. यांच्या खरेदी मालकी व ताबे वहिवाटीच्या असून सदर मिळकत त्यांनी १) सिध्देश शिवाजी वर्षे, २) सचिन उल्हास नवने, ३) संगीता सतीश पानसरे, ४) सुरेखा तान्हाजी ढाले सर्व रा. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे. यांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. त्यानुसार त्यांनी माझे बरोबर बोलणी चालू आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लीन, पोटगी, चोळी बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट इसार पावती इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १५ दिवसाचे आत जिल्हाधिकारी/तहसिल कार्यालयात मुळ कागदापत्रानिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेणेत यावी.

जमिन विक्री कामी जमीन मालक श्री. उल्हास नामदेव नवले रा. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे. यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे विक्री परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते १) सिध्देश शिवाजी वर्षे, २) सचिन उल्हास नवने, ३) संगीता सतीश पानसरे, ४) सुरेखा तान्हाजी ढाले सर्व रा. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे. यांनी विक्री करणार आहेत. शासन परिपत्रक नंबर डब्लूटीएन १०९९/सीआर/२२९/ल-४ दि.१० मार्च २००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्यबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सुचनेनुसार, गावाच्या ५ किलोमिटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेणेसे इच्छुक असल्यास लेखी स्वरूपात १५ दिवसाच्या आत तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांना कळवावे.

परिशिष्ट-जिल्हा पुणे तालुका जुन्नर गाव / ग्रामपंचायत येणेरे

| सर्व्हे नं./गट नंबर | क्षेत्र हे. आर | पो. ख हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| १ | ०.११ | -- | ०.२७ |

| पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|
| गट नं.२ | गट नं.७ | रस्ता | रस्ता |

येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत तदंगभुत वस्तुसह हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

येणेप्रमाणे जाहिर प्रसिध्द
ता. ०७/०९/२०२६.
ठिकाण :- जुन्नर

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट
मु.पो. येणेरे, ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. ९७३०८२८७२१.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: गांव मौजे खुबी, ता. जुन्नर जि.पुणे येथील लोकांस या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत गांव मौजे खुबी येथील गावठाण हद्दीतील घर मिळकत व घर मिळकतीची असलेली भुई जागा मिळकत त्यासी ग्रा.पं.मि.नं. ८७, ८७/१,८७/२ व ८७/३ चे विद्यमान मालक १) श्रीमती. सोनाली किसन कुचेकर, २) शोभा किसन कुचेकर, दोघेही रा. ब्लॉक नं.४, पंचवटी अपार्टमेंट, जोशीवाडा, जैनम हॉस्पिटल जवळ, टेंभीनाका, चरई, ठाणें ४००६०१ यांचे स्वतंत्र मालकीची घर मिळकत असून, सदरची घर मिळकत ही १) श्री. गिरीराज महेंद्र मोजाड व २) आरूष रवि मस्करे रा. मु.पो. सितेवाडी, ता. जुन्नर जि. पुणे यांनी खरेदीखत करण्याचे ठरविलेले आहे.

खालील परिशिष्ट मध्ये नमुद मिळकत ही निर्वेध व निजोखमी असलेबाबत भरोसा व अशी हमी खरेदीदार यांना वर नमुद केलेले जमिन मिळकतीचे विदयमान मालक यांनी दिलेला आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, अधिकार, दावा, ताबा म्हणजेच गहाण, दान, लीज, लिन, बक्षिस, खरेदी-विक्री, साठेखत, चोळी, बांगडी, वाटप, पोटगी, रस्ता, वहीवाट, इतर वारसां हक्क इत्यादी स्वरुपाचे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार तसेच हित संबध अथवा इतर कोणताही मालकी हक्क नाही, असे आमचे अशिलास खात्रीलायक सांगितलेले आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आमचे अशिलांचे पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्या निशी संपर्क साधावा व तशी खात्री करुन दयावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध निजोखीम आहे असे समजुन सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीव पुर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

परिशिष्ट

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे पोट तुकडी जुन्नर ता. जुन्नर, तसेच मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे व ग्रामपंचायत खुबी ता. जुन्नर, जि. पुणे येथील गावठाण हद्दीतील घर मिळकत व घर मिळकतीची असलेली भुई जागा मिळकत त्यासी ग्रा.पं.मि.नं. ८७, ८७/१,८७/२ व ८७/३ वरील मिळकती.

यांसी चतुः सिमा रेकॉर्डस ऑफ राईटस् प्रमाणे.

जुन्नर,
ता. ०९/०९/२०२६.

सही/-
येणेप्रमाणे जाहिर चोटीस
ॲड. नंदकुमार मोतीराम चौधरी, जुन्नर
मोबाईल : 9970340765

## थोडक्यात पण महत्वाचे



### हिंदुस्थान अँटिबायोटिक्स शाळा २००३ बॅचच्या रियुनियनमध्ये रंगला गुरु-शिष्य स्नेहसोहळा

पिंपरी : दैनिक संध्या

शाळा सुटली, वर्ग बदलले, प्रत्येक जण आपापल्या आयुष्यात रमला; मात्र शाळेच्या आठवणी आणि मैत्रीची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. याच जिव्हाळ्याचा अनुभव हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या २००३ इंग्लिश मीडियम बॅचच्या रियुनियनमध्ये आला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा हा स्नेहमेळावा रविवार, दि.६ सप्टेंबर रोजी श्री कृष्ण पॅलेस हॉटेल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या आग्रहाला मान देत शिक्षक अॅड.आशुतोष रानडे, रमेश गाढवे, अनिथा कदम (स्टीवन मिस) आणि कविता गायकवाड, मुकेश पवार आवर्जून उपस्थित राहिले. अनेक वर्षांनंतर शिक्षक आणि विद्यार्थी पुन्हा एकत्र आल्याने वातावरण भावनिक झाले. शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला आणि मनोगत व्यक्त केले. 'गुरुंचे ऋण कधीही फेडता येत नाही' या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेने दिलेले शिक्षण, संस्कार आणि आयुष्याला दिशा देणारे मार्गदर्शन याबद्दल विद्यार्थ्यांनी विद्यालयाची तसेच शिक्षकांची मनापासून प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयातील दिवंगत शिक्षक, कर्मचारी आणि दिवंगत माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत सर्वांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे श्लोक म्हणत आपल्या गुरुजनांना मानवंदना दिली. रियुनियनच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे नियोजन केले होते. संगीत, मनोरंजन आणि हास्य-विनोदाने कार्यक्रमाला रंगत आणली. जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीने शालेय जीवनातील खोड्या, गमती-जमती आणि अविस्मरणीय प्रसंगांच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रपरिवाराने शाळेच्या आठवणींमध्ये रमून एकमेकांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले. 'शाळा म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत, तर आयुष्यभर सोबत राहणाऱ्या आठवणी, संस्कार आणि नाती आहेत,' याची प्रचिती या रियुनियनमधून आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमीन अझीझ आणि दिपाली दंदाडे यांनी केले आणि प्राजक्त घोरपडे यांनी आभार व्यक्त केले.

### योजनांच्या अर्ज स्वीकृती प्रक्रियेचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते शुभारंभ

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अर्ज स्वीकृती प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. महानगरपालिका क्षेत्रातील महिला, बालके, दिव्यांग व्यक्ती, मागासवर्गीय तसेच गरजू व वंचित घटकांतील पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अर्ज प्रक्रिया अधिक सुटसुटीत व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे. समाज विकास विभागामार्फत विविध घटकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महानगरपालिकेच्या स्तरावर विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, अर्ज प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे तसेच विहित निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. अर्ज प्रक्रियेदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याबरोबरच आवश्यकतेनुसार ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या. विशेषतः डिजिटल माध्यमांचा वापर करताना अडचणी येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्तींना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले. अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रतेचे निकष, अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती तसेच योजनांशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांना स्पष्ट व सुलभ स्वरूपात उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. अर्जातील त्रुटी अथवा तांत्रिक अडचणींमुळे पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची संबंधित विभागाने दक्षता घ्यावी. तसेच नागरिकांना अर्ज प्रक्रियेसाठी अनावश्यकपणे कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासणार नाही, यासाठी आवश्यक प्रशासकीय व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### धनगर ST आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन;

पिंपरी : दैनिक संध्या

धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखंड धनगर समाज, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. निगडी येथील अप्पर तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या माध्यमातून हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले. धनगर समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी समाजाच्या वतीने चार प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने धनगर ST आरक्षणाची बाजू पूर्ण ताकदीने आणि गांभीर्याने मांडावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. दि. ८ सप्टेंबर २०२६ पूर्वी आरक्षणाच्या समर्थनार्थ सर्व कायदेशीर आणि घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे ठोस प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल करावे तसेच अनुभवी आणि सक्षम वकिलांची नियुक्ती करून धनगर समाजाची बाजू प्रभावीपणे मांडावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, धनगर ST आरक्षणाबाबत कोणताही प्रतिकूल निर्णय झाल्यास समाजाला ST प्रमाणपत्राचा लाभ मिळण्यासाठी शासनाने पर्यायी 'प्लॅन बी' तयार ठेवावा, अशीही मागणी करण्यात आली. निवेदनात श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र विशेष शासकीय कायदा करण्याची मागणीही करण्यात आली आहे. देवस्थानच्या विश्वस्त मंडळामध्ये किमान २१ विश्वस्तांचा समावेश असावा आणि अध्यक्षपद धनगर समाजातील व्यक्तीस देण्यात यावे, अशी भूमिका समाजाच्या वतीने मांडण्यात आली. तसेच मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला स्वातंत्र्यवीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याची मागणीही धनगर समाजाने निवेदनाद्वारे केली आहे. धनगर समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन समाजाला न्याय द्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली. निवेदन सादर करताना भिवाजी शिंगटे, भरत महानवर, राहुल मदने, दीपक भोजने, नामदेव मासाळ, सुधाकर अर्जुन, विकास महानवर, प्रविण मासाळ यांच्यासह सकल धनगर समाजाचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाश्वत विकासासाठी पुढील ५० वर्षांचा आराखडा

## महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून सूर्यवंशी यांच्या व्हिजनचे कौतुक

■ पिंपरी (दै. संध्या)

विरोध नोंदवताना प्रत्येकाने संवैधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. अन्यथा अराजकाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी दिला.

मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित विशेष सन्मान सोहळ्यास महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, लोकमतचे संपादक संजय आवटे, दैनिक पुढारीचे संपादक सुनील माळी, लेट्स अप मराठीचे संपादक योगेश कुटे, पुढारी माध्यम समूहाच्या सहसंपादिका मृणालिनी नानिवडेकर, न्यूज 18 मराठीचे सहसंपादक विशाल परदेशी यांच्यासह विविध माध्यम समूहांचे पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना राहुल नार्वेकर बोलत होते. यावेळी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत विकासाचे व्हिजन संगणकीय सादरीकरणाद्वारे मांडले.

राहुल नार्वेकर यांनी पिंपरी चिंचवडच्या विकासाचे कौतुक करताना सांगितले की, पिंपरी चिंचवड हे आशिया खंडात आणि जगभरात नावाजलेले तसेच वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहरातील पायाभूत सुविधा आणि नागरी सोयी-सुविधा उल्लेखनीय आहेत. मात्र, भविष्यातील गरजा आणि वाढते शहरीकरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

उपलब्ध नागरी सुविधांचा सर्वांगीण विचार करून पिंपरी चिंचवडच्या सूक्ष्म आणि नियोजनबद्ध विकासाचे मॉडेल तयार करण्याचे उद्दिष्ट आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी समोर ठेवले आहे. या उद्दिष्टाच्या दिशेने ते निश्चितपणे यशस्वी वाटचाल करतील आणि शहराला विकासाची नवी उंची प्राप्त करून देतील.



### पुढील ५० वर्षांसाठी पिंपरी चिंचवडचा विकास आराखडा

यावेळी संगणकीय सादरीकरणाद्वारे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत, नियोजित आणि दीर्घकालीन विकासाचे विविध पैलू मांडले. यामध्ये आगामी ५० वर्षांसाठी पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन, महापालिका हद्दीतील उंचावरील पाणीसाठे, पवना व इंद्रायणी नदीकाठ विकास प्रकल्प, ड्रेनेज मास्टर प्लॅन, पुढील २५ वर्षांसाठी शाश्वत घनकचरा व्यवस्थापन, महापालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षित जागांची सद्यस्थिती व भविष्यातील विकास योजना, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शहरी नाले सुधारणा प्रकल्प, डीपी रस्ते, डेटा सेंटर धोरण आराखडा आणि पार्किंग धोरण यांचा समावेश आहे. तसेच शहराचे सुशोभीकरण, शहरी हरितीकरण, उद्यानांचा विकास व अद्ययावतीकरण, रुग्णालय सेवांचे बळकटीकरण, भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्रे, बल्क वेस्ट जनरेटरसाठी नोंदणीकृत भागीदारांमार्फत सुविधा, प्रतिभा शोध कार्यक्रम, अभ्यासिका व व्यायामशाळांची संख्या वाढविणे, स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी स्वाभिमान धोरण, सर्वांसाठी सुलभ पिंपरी चिंचवड, दिव्यांगांसाठी रोजगार निर्मिती, 'ऑपरेशन कायापालट' अंतर्गत स्वच्छता गृह धोरण, क्रीडा सुविधा, पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन, सायन्स पार्क विकास, महापालिका कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण धोरण, सेवानिवृत्तीच्या दिवशी पेन्शन योजना, प्रशासकीय कार्यक्षमता व पारदर्शकता, सुशासन सुधारणा तसेच 'स्वागतम ई-पास' आदी विविध उपक्रमांची माहिती डॉ. सूर्यवंशी यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

### सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव..

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले, एसएनबीपी स्कूलचे अध्यक्ष डी. के. भोसले, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे, महाराष्ट्रातील पहिले मीडिया टॉवर उभारणारे औटी ग्रुपचे अध्यक्ष बाबासाहेब औटी आणि 'दान से उडान' उपक्रम यशस्वीपणे राबविणारे रवी घाटे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.मुंबई लोकमतचे वरिष्ठ पत्रकार दुर्गेश सोनार, दैनिक सकाळचे मुख्य वार्ताहर पितांब लोहार, पुढारीचे वरिष्ठ वार्ताहर मिलिंद कांबळे आणि ज्येष्ठ पत्रकार माधव सहस्त्रबुद्धे यांचा पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रदेश उपाध्यक्ष विवेक इनामदार यांनी आभार मानले. संदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. पत्रकारांनी प्रशासनाला नेहमी आरसा दाखवायला हवा आणि त्या आरशात दिसणारा चेहरा सुधारण्याचे काम प्रशासनाने केले पाहिजे. पत्रकारांनी मांडलेल्या प्रश्नांकडे टीका म्हणून न पाहता त्यातून शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा ओळखण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा, अशी भूमिका डॉ. सूर्यवंशी यांनी व्यक्त केली. शहराचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे आणि नागरिक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा आहे. नागरिकांच्या अपेक्षा समजून घेत, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून आणि पारदर्शक पद्धतीने प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी महापालिका कार्यरत राहील.

बऱ्याच वर्षांनंतर पिंपरी चिंचवड शहरात येण्याची संधी मिळाली. पूर्वी गावाच्या स्वरूपात असलेल्या या परिसराने गेल्या काही दशकांत अत्यंत प्रभावशाली आणि विकसित शहर म्हणून घेतलेली झेप ही केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण आशियासाठी एक उत्तम उदाहरण आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही आशियातील नावाजलेल्या महानगरपालिकांपैकी एक असून, वेगाने होणारे शहरीकरण अधिक नियोजनबद्ध आणि शाश्वत पद्धतीने कसे करता येऊ शकते, याचे उत्तम उदाहरण या शहरातून पाहायला मिळते, असेही त्यांनी सांगितले.

शहराचा विकास केवळ पायाभूत सुविधांच्या निर्मितीपुरता मर्यादित नसतो. वाढत्या शहरीकरणासोबत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, प्रशासन अधिक सक्षम करणे आणि नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे. या दृष्टीने पिंपरी चिंचवडमध्ये होत असलेले काम महत्त्वपूर्ण आहे, असे राहुल नार्वेकर यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात राहुल नार्वेकर यांची प्रकट मुलाखतही रंगली. विविध माध्यमांच्या संपादकांनी विचारलेल्या प्रश्नांना राहुल नार्वेकर यांनी दिलखुलास उत्तरे देत जोरदार फटकेबाजी केली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सन्मान स्वीकारताना म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराने मला आपल्यात सामावून घेतले आहे. या शहराचा नावलौकिक अधिक उंचावत असताना त्याचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधणे हे माझ्यासमोरील प्रमुख उद्दिष्ट आहे. आज मिळालेल्या या सन्मानामुळे माझ्या जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली असून, शहराच्या विकासासाठी निश्चितपणे प्रयत्नांची पराकाष्ठा करेन.

शहरातील विविध समस्या, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनासमोरील प्रश्न शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकार करीत असतात. नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासोबतच प्रशासनाच्या कामकाजाकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याचे आणि आवश्यक तेथे प्रश्न उपस्थित करण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात.

पत्रकारांनी केलेली टीका तसेच त्यांनी प्रशासनासमोर मांडलेल्या समस्या शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. त्यातून महापालिका प्रशासनाला आपल्या कामातील त्रुटी समजतात आणि त्यामध्ये सुधारणा करण्याची संधी मिळते, असे डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले.

## नायजेरियन महिलेवर पोलिसांची कारवाई

पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विशेष शाखा-२ अंतर्गत परकीय नागरिक नोंदणी विभागाने बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या एका नायजेरियन महिलेवर कारवाई करून तिला तिच्या मायदेशी हद्दपार केले आहे.

हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक परदेशी महिला बेकायदेशीरपणे राहत असल्याची गोपनीय माहिती परकीय नागरिक नोंदणी विभागाला प्राप्त झाली होती. त्यानुसार विभागाने संबंधित महिलेची चौकशी केली असता तिच्याकडे वैध पासपोर्ट व व्हिसा नसल्याचे आढळून आले. त्यानंतर तिची बायोमेट्रिक पडताळणी ऑनलाईन डीपीएम प्रणालीद्वारे करण्यात आली.

पडताळणीत संबंधित महिलेचे



नाव गिफ्ट ओकोह (GIFT OKOH) असून ती नायजेरिया देशाची नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. ही महिला २३ सप्टेंबर २०१४ रोजी वैद्यकीय व्हिसावर भारतात आली होती. जयपूर व पालघर येथे वास्तव्यानंतर ती पिंपरी-चिंचवड परिसरात राहत होती. मात्र, तिच्या पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपल्यानंतरही ती भारतात वास्तव्यास असल्याचे तपासात उघड झाले. संबंधित महिलेकडे कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याने तिला मायदेशी परत पाठविण्यासाठी नायजेरियन उच्चायुक्तालय, नवी दिल्ली यांच्याकडून इमर्जन्सी ट्रॅव्हल डॉक्युमेंट तसेच एफआरआरओ मुंबई कार्यालयाकडून एक्झिट परमिट प्राप्त करण्यात आले. यानंतर ८ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून संबंधित महिलेला नायजेरिया येथे डिपोर्ट (हद्दपार) करण्यात आले. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर पुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड व डॉ. बसवराज तेली, पोलीस उपायुक्त धीरज पाटील आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील पंधरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## दहीहंडीचा खर्च टाळून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलवले हास्य..!

■ पिंपळे गुरव (दै. संध्या)

उत्सवाची परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधत पिंपळे गुरव येथील अखिल नेताजी नगर दहीहंडी उत्सव समितीने यंदा दहीहंडी उत्सव साधेपणाने साजरा केला. जुनी सांगवी येथे लोखंडी कमान अंगावर पडून महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर समितीने दहीहंडीचा उत्सवाचा खर्च टाळून तो सामाजिक उपक्रमासाठी देण्याचा निर्णय घेतला.

जुनी सांगवी येथील दुर्घटनेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुःखद असल्याने परिसरात शोककळा पसरली होती. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याबरोबरच सामाजिक संवेदनशीलता जपण्याचा निर्णय समितीने घेतल्या नुसार दहीहंडी उत्सवासाठी होणारा खर्च टाळून पिंपळे गुरव येथील ममता अंध-अनाथ कल्याण केंद्र आणि दापोडी येथील सरस्वती अनाथ शिक्षण संस्थेतील चिमुकल्यांना दहीहंडीच्या निमित्ताने अन्नदान करण्यात आले. या उपक्रमातून उत्सवाचा आनंद वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सर्व वर्गणीदार आणि सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाचे रूपांतर एका विधायक सामाजिक उपक्रमात करण्याचा निर्णय समितीने घेतला. उत्सव केवळ जल्लोषाचा नसून सामाजिक जाणीव आणि माणुसकी जपण्याचे माध्यमही ठरू शकतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## जुनी सांगवी येथे शिवसेनेची 'घोंगडी बैठक' उत्साहात; संघटन बळकटीवर भर

■ पिंपरी (दै. संध्या)

शिवसेना पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने प्रभाग क्रमांक ३२, जुनी सांगवी येथे 'घोंगडी बैठक – टप्पा ०६' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत पक्ष विस्तार, युवकांचा सहभाग आणि तळागाळापर्यंत संघटना पोहोचविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीस शिवसेनेचे महानगरप्रमुख राजेश किसनराव फलके, युवासेनेचे जिल्हाप्रमुख सागर पाचर्णे तसेच चिंचवड विधानसभा प्रमुख बापू कातळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रभाग क्रमांक ३२ मधील शिवसेना, युवासेना तसेच सर्व आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बैठकीचे नियोजन केले होते. बैठकीला शाखाप्रमुख, विभागप्रमुख, प्रभागप्रमुख, उपप्रमुख, विधानसभा पदाधिकारी आणि तळागाळातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परिसरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. बैठकीदरम्यान शिवसेनेची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, अधिकाधिक युवकांना संघटनेशी जोडणे, पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक क्षमता वाढविणे आणि पक्ष विस्तारासाठी प्रभावी नियोजन करण्यावर चर्चा करण्यात आली. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.



## थोडक्यात पण महत्वाचे

### इ पॉस मशीन बंद आंदोलन : सर्व स्वस्त धान्य दुकानदार सहभागी : गणेश रत्नपारखी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**



राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी एक दिवसीय e-POS मशीन बंद आंदोलन जाहीर करण्यात आले होते. तर शिरूर तालुक्यातील सर्वच रास्त दुकानदारांनी या आंदोलनात पॉस मशीन बंद ठेवत सक्रिय सहभाग नोंदवला असल्याची माहिती शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष गणेश माधवराव रत्नपारखी यांनी दिली आहे. या आंदोलनामागील प्रमुख कारणे म्हणजे सततच्या नेटवर्क समस्या, ई - पॉस मशीनमध्ये धान्य वितरणासाठी अडचणी, वारंवार होणारे सर्व्हर डाउन तसेच सर्व्हर / नेटवर्क कनेक्टिव्हीटी च्या समस्या. तांत्रिक अडचणींमुळे रास्त भाव दुकानदारांना तसेच लाभार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे रत्नपारखी यांनी सांगितले. संघटनेच्या वतीने आंदोलन दरम्यान कोणत्याही दुकानदाराने इ पॉस मशीन सुरू करू नये, लाईव्ह करू नये किंवा धान्य वितरण करू नये, असे आवाहन करण्यात आले होते. तसेच संपूर्ण दिवस इ पॉस मशीन बंद ठेवून राज्य संघटनेच्या आंदोलनाला सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून शिरूर तालुक्यातील बहुसंख्य स्वस्त धान्य दुकानदार काल या आंदोलनात सहभागी झाले असल्याची माहिती तालुका अध्यक्ष गणेश रत्नपारखी,नवनाथ खैरे खजिनदार,संतोष सरोदे सचिव,सचिन नरवडे सहसचिव,राज्य संघटनेचे सहसचिव इंद्रभान ओव्हाळ,राज्य कार्याध्यक्ष प्रभाकर पाडळे,शरद कालेवर यांनी दिली. "एकजूट दाखवूया - आंदोलन यशस्वी करूया !" असा संदेश देत शिरूर मधील सर्व रास्त भाव दुकानदारांनी आंदोलनात सहभागी होत पाठिंबा दिला असल्याचे या वेळी सांगण्यात आले.




### बढेकर यांची स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या राज्य महिला आघाडी प्रमुखपदी नियुक्ती

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या राज्य महिला आघाडीच्या प्रमुखपदी श्रीमती हेमलता बाळासाहेब बढेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाच्या वतीने दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. महासंघाच्या माध्यमातून राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार तसेच महिला बचत गटांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या कार्यात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने हेमलता बढेकर यांच्यावर राज्य महिला आघाडीच्या प्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. स्वस्त धान्य दुकानदार परवानाधारक महिलांचे सक्षमीकरण, त्यांच्या विविध प्रश्नांबाबत शासनस्तरावर पाठपुरावा तसेच धोरणात्मक व शासकीय निर्णयांच्या माध्यमातून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करण्याची अपेक्षा नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल हेमलता बढेकर यांची महासंघाच्या पदाधिकारी व सदस्यांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या माध्यमातून राज्यातील महिला परवानाधारक यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे व्यासपीठ मिळेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नियुक्ती पत्रावर अध्यक्ष डी. एन. पाटील, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत यादव आणि ज्येष्ठ उपाध्यक्ष राजेश आंबेकर यांच्या स्वाक्षऱ्या असून पुणे जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल,शिरूर तालुका अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनी बढेकर यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.

### महिला दहीहंडीचा उत्साह; मुलींच्या धाडसी गोविंदा पथकांनी जिंकली उपस्थितांची मने

**शिरूर: दैनिक संध्या**



स्वराज्य रक्षक फाऊंडेशन व पुणे ग्रामीण न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला शिरूर तालुका महिला दहीहंडी उत्सव रविवारी (दि. ६ सप्टेंबर) रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर उत्साहपूर्ण व जल्लोषाच्या वातावरणात पार पडला. मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत सादर केलेल्या थरारक दहीहंडीच्या प्रयत्नांनी उपस्थितांची मने जिंकली. या महिला दहीहंडी स्पर्धेत शिरूर तालुक्यातील अभिनव विद्यालय, सरदवाडी; कारेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल, कारेगाव; आय.टी.के.बी. कराटे क्लास, शिरूर; शितोळे पोलीस अकॅडमी, शिरूर तसेच सिताबाई थिटे डी. फार्म कॉलेज, शिरूर या संघांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे होत्या. यावेळी नगरसेविका संगीता मल्लाव, नगरसेवक सागर नरवडे, शशिकला काळे, भाजपा महिला आघाडीच्या शिरूर शहर अध्यक्षा प्रिया बिराजदार, उपाध्यक्षा सुष्टी करंजुले सुवर्णा सोनवणे, उषा वाखारे, डॉ. वैशाली साखरे, आदी उपस्थित होते. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने उत्सवाला सुरुवात झाली. सहभागी सर्व संघांनी प्रथम दहीहंडीला सलामी दिली. त्यानंतर चिठ्ठीद्वारे संघांची क्रमवारी निश्चित करून प्रत्येक संघाने दहीहंडी फोडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. चारही संघांतील मुलींच्या धाडसी आणि कौशल्यपूर्ण खेळामुळे आयोजक, पंच व उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. स्पर्धेतील चुरस लक्षात घेऊन बक्षिसांची विभागणी चारही संघांमध्ये करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी केवळ व्यासपीठावरून कार्यक्रमाचे निरीक्षण न करता थेट मैदानात जाऊन सहभागी मुलींचा उत्साह वाढविला. मुलींच्या धैर्याचे कौतुक करत त्यांनी, "महिला दहीहंडीचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. पुढील वर्षी या उत्सवासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी आपण प्रयत्न करू. शिरूर तालुक्यातील अधिकाधिक शाळा व महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभागी व्हावे," अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अर्जुन बढे व अमृत झांबरे यांनी केले. तर पंच म्हणून महेबुब सय्यद, पत्रकार फैजल पठाण व राणी शिवाजी बनकर यांनी काम पाहिले. यावेळी पत्रकार मुकुंद ढोबळे, धुमाळ, फैजल पठाण, अर्जुन बढे, सुदर्शन दरेकर, अमृत झांबरे, महेबुब सय्यद, पाचंगे, किरण झांबरे, अश्विनी सांगळे, रूपाली खिलारी, सुवर्णा नळकांडे, विक्रम ठाकूर, सुजित लिमन यांच्यासह सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विविध पदाधिकारी आणि शिरूर शहरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या उपक्रमाला यशोदा ग्रुप, प्रथमेश मसाले, राधानगरी प्लॉट तसेच रुबी हॉल हॉस्पिटलचे विशेष सहकार्य लाभले. दहीहंडीची ट्रॉफी व बक्षिसे नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे व नगरसेवक सुनीलदादा जाधव यांच्या वतीने देण्यात आली. महिला दहीहंडी उत्सव यशस्वी करण्यासाठी स्वराज्य रक्षक फाऊंडेशनचे पदाधिकारी, पुणे ग्रामीण न्यूजचे पत्रकार, शिवश्री न्यूज चॅनेलचे पदाधिकारी तसेच शिरूर शहरातील महिला भगिनींनी विशेष परिश्रम घेतले.

# चतुरचंद महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा

■ बारामती (दै. संध्या)

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील पर्यावरण शिक्षण विभागाच्या वतीने पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची संकल्पना रुजविणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. या कार्यशाळेत दहिगाव हायस्कूल, दहिगावचे दीपक कुंभार यांनी प्रशिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी एकूण ३५ पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. कार्यशाळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गोरखनाथ मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. समन्वयक रमेश गोसावी व संजय शेंडे यांनी सहकार्य केले. वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.योगिनी मुळे यांनी कार्यशाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींची पाहणी केली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यशाळेचे नियोजन पर्यावरण विभागाच्या प्रमुख अनिता पाटील तसेच, पांडुरंग ओवेकर व उदय कळंत्रे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली.



## दफनभूमीतून रस्ता काढण्यास ख्रिश्चन समाजाचा तीव्र विरोध

**१९६५ च्या नकाशानुसार हद्द निश्चित करण्याची मागणी; तहसीलदार व नगराध्यक्षांकडे निवेदन**

■ शिरूर (दै. संध्या)



शिरूर शहरातील रामलिंग रोड परिसरातील सिटी सर्वे नं. ४५/ब येथील ख्रिश्चन दफनभूमीच्या हद्दीवरून वाद निर्माण झाला असून, दफनभूमीतून रस्ता काढण्याच्या मागणीला सकल ख्रिश्चन समाजाने तीव्र विरोध दर्शविला आहे. दफनभूमीची कायदेशीर मोजणी करून सन १९६५ च्या मोजणी नकाशानुसार हद्द निश्चित करावी आणि त्यानंतरच रस्त्याबाबत कोणताही निर्णय घ्यावा, अशी मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत सकल ख्रिश्चन समाज, शिरूरचे तालुका अध्यक्ष युवराज राजू सोनार व समस्त ख्रिस्ती बांधवांच्या वतीने नायब तहसीलदार स्नेहा गिरीगोसावी तसेच शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. ऐश्वर्या पाचरणे यांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कोणत्याही पक्षावर अन्याय होणार नाही, अशी भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनानुसार, शिरूर नगरपरिषद हद्दीतील सर्वे नं. ४५/अ/१/अ/३ मधील ४५/बचे सुमारे १ हेक्टर ३४ आर क्षेत्र सन १९६० पासून, किंबहुना त्यापूर्वीपासून ख्रिश्चन समाजाच्या दफनभूमीसाठी वापरात असल्याचा दावा समाजाच्या वतीने करण्यात आला आहे. शिरूर शहर व परिसरातील ख्रिश्चन समाजातील नागरिकांचे अंत्यविधी अनेक वर्षांपासून याच ठिकाणी होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, काही व्यक्तींकडून दफनभूमीच्या जागेतून रस्ता काढण्याची मागणी केली जात असून, या ठिकाणी लोखंडी गेट व कमान उभारण्यात आल्याचा आरोप समाजाच्या वतीने करण्यात आला आहे. संबंधित जागेत अनेक मृत व्यक्तींच्या कबरी असल्याचा दावा करण्यात आल्याने या ठिकाणाहून रस्ता काढल्यास कबरींचे नुकसान होऊन धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच गुरुकुल गृहनिर्माण संस्थेने मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ मधील कलम ५ अंतर्गत तहसील कार्यालयात प्रकरण दाखल केले असून, त्यामध्ये चुकीचा अथवा खोटा आशय मांडण्यात आल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. मात्र, हे सर्व आरोप तक्रारदार पक्षाचे म्हणणे असून, संबंधित कागदपत्रांची अधिकृत पडताळणी व प्रशासनाच्या चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. समाजाच्या म्हणण्यानुसार, सर्वे नं. ४५/अ/१/अ/३ मध्ये जाण्या-येण्यासाठी दफनभूमीच्या संरक्षक भिंतीलगत यापूर्वीच रस्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे. असे असतानाही दफनभूमीच्या जागेतूनच रस्ता काढण्याची मागणी का केली जात आहे.

## विशेष मुलांनी शिरूर पोलिसांच्या मनगटावर बांधली प्रेमाची राखी



■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या रोडवरील आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने शिरूर पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 'स्ट्रेस मॅनेजमेंट' या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. डॉ. सोनाली हार्दे व डॉ. मनीषा चोरे यांनी पोलिसांना ताणाची लक्षणे, मानसिक आरोग्य आणि ताण व्यवस्थापनाच्या उपायांबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

यावेळी आकांक्षा स्पेशल चाईल्ड स्कूलमधील विशेष मुलांनी स्वतः तयार केलेल्या राख्या पोलीस बांधवांच्या मनगटावर बांधून रक्षाबंधन साजरे केले.

विशेष मुलांच्या निरागस प्रेमामुळे पोलीस आणि मुलांमध्ये स्नेहाचा अनोखा बंध निर्माण झाला. त्यानंतर मुलांनी दहीहंडी फोडून आनंदोत्सव साजरा केला. शिक्षक दिनानिमित्त मुख्याध्यापिका आरती बोऱ्हाडे, विशेष शिक्षक कुणाल बिडगर, दत्तात्रेय दुबे तसेच मदतनीसांचा सन्मान करण्यात आला."ताण टाळता येत नाही; मात्र त्याला सामोरे जाण्याची पद्धत बदलता येते," हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली. संस्थापिका ॲड. रानीताई चोरे यांनी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी, पालक, शिक्षक व मान्यवरांचे आभार मानले.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उभी राहिलेली शैक्षणिक चळवळ प्रेरणादायी



■ ओतूर (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. व्ही. एम. शिंदे यांचे 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळ : वसा आणि वारसा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात कै. बाबुरावजी घोलप साहेब, दिवंगत रामकृष्ण मोरे साहेब आणि स्वर्गीय अजितदादा पवार साहेब यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रास्ताविकात एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या स्थापनेमागील उद्देश, ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न तसेच संस्थेची प्रेरणादायी वाटचाल याविषयी माहिती दिली. प्रमुख पाहुणे व व्याख्याते डॉ. व्ही. एम. शिंदे यांनी शैक्षणिक कार्याचा इतिहास उलगडताना सांगितले की, ग्रामीण भागात पूर्वी शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. अज्ञान, दारिद्र्य आणि निरक्षरतेमुळे ग्रामीण समाजाच्या विकासास मोठा अडथळा निर्माण झाला होता. 'बुडते हे जन, न देखवे डोळा, येतो कळवळा' या भावनेतून शिक्षणाची गरज ओळखून शिक्षणप्रेमी व्यक्तींनी ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था उभारण्याचे कार्य हाती घेतले.

## स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे पॅरामेडिकल कॉलेजचा शुभारंभ

■ चाकण(दै. संध्या)

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्था आणि स्कोप पॅरामेडिकल कॉलेज, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे पॅरामेडिकल कॉलेजच्या माध्यमातून विविध शासकीय मान्यताप्राप्त पॅरामेडिकल अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या कॉलेजचा शुभारंभ मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी स्कोप पॅरामेडिकल कॉलेजचे हर्षल कुंडलसकर, स्नेहल सुतार, अतुल गदळे, मनशक्तीचे सदस्य अजित फापाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे व मुख्याध्यापिका प्रमिला गोरे आदी उपस्थित होते.

पॅरामेडिकल कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आरोग्य क्षेत्रात करिअरच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. 'आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा' हा संकल्प घेऊन विद्यार्थ्यांसाठी मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, एक्स-रे टेक्निशियन डिप्लोमा, रेडिओलॉजी अँड मेडिकल इमेजिंग टेक्नॉलॉजी तसेच इतर पॅरामेडिकल अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे अभ्यासक्रम १ ते ३ वर्षांच्या कालावधीचे असून विद्यार्थ्यांना अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, आधुनिक प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि इंटर्नशिपची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे विकास गोरे व प्रमिला गोरे यांनी सांगितले.




या शैक्षणिक वर्षात १५ विद्यार्थ्यांच्या पहिल्या बॅचचे प्रवेश पूर्ण झाले आहेत. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत तसेच त्यांच्या पालकांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यालयातील इयत्ता १० वी ते १२ वीचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात राहुल कुंडलसकर, स्नेहल सुतार आणि अतुल गदळे यांनी पॅरामेडिकल अभ्यासक्रमांविषयी मार्गदर्शन केले. चाकण परिसरातील विद्यार्थ्यांना आरोग्य सेवा क्षेत्रात शिक्षण घेऊन उज्वल करिअर घडविण्यासाठी हे प्यारा मेडिकल कॉलेज महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार असल्याचे प्राचार्या प्रमिला गोरे यांनी सांगितले.

विकास गोरे यांनी स्वागत केले. दत्तात्रय लिंभोरे यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय गायकवाड यांनी आभार मानले.

# कुंभारवळणातील 'ममता बालसधन'च्या मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप

■ सासवड (दै. संध्या)

प्रणिती ग्रामीण संस्था, पुणे व राजे उमाजी नाईक प्रतिष्ठान, राख यांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाजसुधारक डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या पुरंदर तालुक्यातील कुंभारवळन येथील 'ममता बालसधन' मधील मुलींना नुकतेच शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे येथील विद्यार्थिनींना मोठा दिलासा मिळाला असून, उपस्थितांनी या बालकांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

कार्यक्रमात प्रास्ताविक व मनोगत व्यक्त करताना प्रणिती ग्रामीण संस्थाचे संस्थापक-अध्यक्ष शांताराम राणे यांनी, यापुढेही संस्थेला आर्थिक व वस्तू स्वरूपात सातत्याने मदत दिली जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच, एचडीएफसी बँकेचे अधिकारी निलेश चव्हाण यांनीही राजे उमाजी नाईक प्रतिष्ठानच्या माध्यमातून या संस्थेस विशेष आर्थिक मदत देण्याची घोषणा केली.

यावेळी ममता बालसधनच्या वसतिगृह अधीक्षक सीमा पानसरे, दीपक गायकवाड, संदीप गायकवाड, तसेच राजे उमाजी नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आकाश चव्हाण, उपाध्यक्ष सुयश चव्हाण, खजिनदार संकेत चव्हाण, सदस्य समीर चव्हाण, अक्षय चव्हाण, प्रतीक सोनवणे, प्रशांत चव्हाण, ओंकार चव्हाण, जय चव्हाण यांच्यासह प्रतिष्ठानचे इतर सर्व सदस्य व ममता बालसधनच्या सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन संदीप गायकवाड यांनी केले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### पीसीयू येथे क्यूएनएक्स आरटीओएस सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन

**पिंपरी : दैनिक संध्या**

योग्य उद्योग भागीदारी, सक्षम पायाभूत सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना जागतिक करिअरच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. ऑटोमोबाईल क्षेत्रातील बदल, रोबोटिक्स, इंडस्ट्रियल ऑटोमेशन, स्मार्ट सिटी, संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि एम्बेडेड सॉफ्टवेअर यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांनी केवळ कोडिंग पुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी स्व संकल्पना विकसित करणे आवश्यक आहे, असे दशरथा एम. यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे पी स्क्वेअर टेक्नॉलॉजीस आणि ब्लॅकबेरी क्यूएनएक्स यांच्या सहकार्याने "क्यूएनएक्स आरटीओएस सेंटर ऑफ एक्सलन्स"चे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. या सेंटर मध्ये विद्यार्थ्यांसाठी एम्बेडेड सिस्टिम्स, रिअल टाइम ऑपरेटिंग सिस्टिम, ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञान आणि इंटेलिजंट मोबिलिटी आणि उद्योगातील अत्याधुनिक तांत्रिक प्रवाह या विषयांवर विद्यार्थ्यांसाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, पी स्क्वेअर टेक्नॉलॉजीसचे प्रोग्राम डायरेक्टर दशरथा एम., ब्लॅकबेरी क्यूएनएक्स चे डायरेक्टर वीरकुमार बीडे, प्राध्यापक, पीसीयूचे विद्यार्थी उपस्थित होते. वीरकुमार बीडे यांनी सांगितले की, क्यूएनएक्स रिअल टाइम ऑपरेटिंग सिस्टिमचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे. आता आधुनिक ऑटोमोटिव्ह, मेडिकल डिव्हाइसेस, इंडस्ट्रियल ऑटोमेशन आणि सेफ्टी क्रिटिकल सिस्टिम्समध्ये त्याचा वापर वाढत चालला होत आहे. उद्योगाच्या या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्यांसह स्व संकल्पना विकसित करण्याची आज गरज आहे. कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी सांगितले की, क्यूएनएक्स आरटीओएस सेंटर ऑफ एक्सलन्स मुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि रोजगार संधी विद्यापीठातच उपलब्ध होतील. प्रत्येक विद्यार्थ्याने या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रम संयोजन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, समन्वयक डॉ. नीरू मलिक यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### जुन्नरला नगरसेवकांविरुद्ध खंडणीच्या गुन्ह्यामुळे खळबळ

**जुन्नर : दैनिक संध्या**

जुन्नर नगर परिषदेच्या विद्यमान दोन नगरसेवक व दोन नगरसेविकांचे पती अशा चौघांविरुद्ध खंडणीप्रकरणी जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेमुळे तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, संबंधित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असल्याचे समजते. याबाबत व्यवस्थापक मुकुंद रत्नाकर डोंगरे यांनी जुन्नर पोलिसांकडे फिर्याद दाखल केली आहे .जुन्नरमधील नंदनवन सोसायटीमध्ये २६ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान गाडेकर इंटरप्राईजेस कंपनीस काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट)मध्ये टाकण्याची धमकी देऊन नगरसेवक प्रशांत सराईकर व वाजीद इनामदार तसेच सोहेल शेख व गणेश पातुरकर यांनी धमकी देऊन चार लाखाची खंडणी वसूल केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. सोहेल शेख हे नगरसेविका सना शफी मन्सूर यांचे तर गणेश पातुरकर हे नगरसेविका अनुजा पातुरकर यांचे पती आहेत. सदर प्रकरणात अन्य चार नगरसेवकांचा या गुन्ह्यात सहभाग तपासण्यात यावा अशी विनंती फिर्यादी कडून पोलिसांना करण्यात आली आहे. आरोपी विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०८(२) ३५१(२) ३(५)प्रमाणे गुन्हा गुन्हा दाखल झाला असून, याप्रकरणी अद्याप कोणालाही अटक झालेली नसून , पोलिस निरिक्षक दत्तात्रेय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक महेश गायकवाड अधिक तपास करत आहेत. याबाबत अधिक माहिती अशी आहे की ,गाडेकर इंटरप्राईजेस कंपनीला जुन्नर नगरपालिकेने कुशल व अकुशल कामगार पुरविण्याचे कंत्राट दिले होते .याबाबत अनेक तक्रारी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे नगरसेवक प्रशांत सराईकर नगरसेवक वाजिद इनामदार सोहेल शेख , गणेश पातुरकर यांनी तुमची एजन्सी ब्लॅकलिस्ट मध्ये टाकू अशी धमकी देऊन या एजन्सीचे मॅनेजर मुकुंद डोंगरे यांच्याकडून सुमारे चार लाख रुपये खंडणी वसूल केली असे फिर्यादीत नमूद केले आहे.गाडेकर इंटरप्रायझेस कंपनीचे मॅनेजर मुकुंद डोंगरे यांनी सोमवारी रात्री उशिरा फिर्याद दिली.

### सैनिक-माजी सैनिकांच्या सुविधांसाठी रत्नागिरी, चिपळूणमधील प्रकल्प प्राधान्याने मार्गी लावणार

**मुंबई : दैनिक संध्या**

सैनिक आणि माजी सैनिकांनी देशसेवेसाठी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवून त्यांच्या कल्याणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. रत्नागिरी येथील सैनिक विश्रामगृह आणि चिपळूण येथील सैनिक व माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी प्रस्तावित वसतीगृहाचे काम प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल, असे माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. मुंबईतील मेघदूत या शासकीय निवासस्थानी रत्नागिरी येथे सैनिक विश्रामगृह उभारणे तसेच चिपळूण, जि. रत्नागिरी येथे सैनिक व माजी सैनिकांसाठी वसतीगृह निर्माण करण्यासंदर्भात मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत आणि आमदार शेखर निकम उपस्थित होते. तसेच माजी सैनिक कल्याण विभागाचे अधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त निधीची उपलब्धता करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत आणि माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई संयुक्त पत्राद्वारे मागणी करणार आहेत. आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या बैठकीत रत्नागिरी येथे सैनिक विश्रामगृह तसेच चिपळूण येथे सैनिक व माजी सैनिकांसाठी वसतीगृह उभारण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सैनिक आणि माजी सैनिकांना आवश्यक निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या दोन्ही प्रकल्पांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली. हे प्रकल्प प्राधान्याने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात समाविष्ट करून त्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री श्री. देसाई यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. रत्नागिरी येथे प्रस्तावित सैनिक विश्रामगृहामुळे जिल्ह्यात येणाऱ्या सैनिक तसेच माजी सैनिकांना निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. चिपळूण येथे प्रस्तावित वसतीगृहामुळे सैनिक व माजी सैनिकांसाठी सुरक्षित आणि आवश्यक निवासव्यवस्था उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे सैनिक व माजी सैनिकांच्या सुविधा अधिक सक्षम होणार असून त्यांच्या कल्याणासाठी शासनाच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. सैनिक आणि माजी सैनिकांच्या सुविधांसाठी आवश्यक असलेली ही दोन्ही कामे प्राधान्याने आणि वेळेत मार्गी लावण्यासाठी माझा ठाम प्रयत्न राहील.

# चाकणला खड्ड्यांनी गिळली रस्ता दुरुस्तीची डेड लाईन

■ चाकण (दै. संध्या)



खड्डे बुजविण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा अल्टिमेटम संपला असून, चाकण परिसरात रस्ता दुरुस्तीची डेड लाईन खड्ड्यांनी गिळल्याने रस्त्यांची दुरावस्था कायम आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी चाकण भागातील रस्त्यांची तातडीने दुरुस्त करण्यासाठी दि.३१ ऑगस्टची मुदत दिली होती. मुदत संपून दहा दिवस झाले तरी चाकण परिसरातील खड्डे व साईडपट्ट्यांची दुरुस्ती रखडलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा अल्टिमेटम संपला असून चाकण परिसरातील रस्त्यांची दुरावस्था कायम आहे. चाकण उद्योग नगरीत समस्यांवर तातडीने तोडगा काढण्याचे शासन आणि प्रशासनाकडून दिलेले आश्वासन हवेतच विरल्याचे चित्र आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दि. ३१ ऑगस्टपर्यंत चाकण परिसरातील खड्डे बुजविणे आणि साइडपट्ट्या दुरुस्त करण्याचे दिलेले आश्वासन मुदत उलटून दहा दिवस झाले तरी बहुतांश ठिकाणी कामे अपूर्णच आहे. मंत्र्यांसमोर अधिकाऱ्यांनी केलेली आश्वासने ही केवळ 'स्टंटबाजी' होती का, असा सवाल आता नागरिक आणि उद्योजकांकडून उपस्थित केला जात आहे. चाकण औद्योगिक वसाहतीतील वाढत्या असुविधांमुळे काही कंपन्यांनी वसाहत सोडण्याचा इशारा दिल्यानंतर शासन आणि प्रशासन खडबडून जागे झाले होते. महाळुंगे येथे पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेल्या उद्योगविषयक बैठकीत उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे प्रशासनाला विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. स्थानिक नागरिक, कामगार आणि उद्योजकांची वाहतूक कोंडीसह अन्य समस्यांतून सुटका करण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र, बैठक होऊन काही दिवस उलटताच या आश्वासनांची धार बोथट झाल्याचे दिसून आले.

### खड्डे व साईड पट्ट्यांची दुरुस्ती रखडलेलीच

जिल्हाधिकाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांनी ठराविक मुदतीत कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असतानाही प्रत्यक्ष परिस्थितीत फारसा बदल झालेला नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी ३१ ऑगस्टपर्यंत चाकण औद्योगिक वसाहतीतील खड्डे बुजविण्याचे, तसेच पुढील दहा महिन्यांत नागरिकांना प्रशस्त आणि पक्के रस्ते उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते.

"

चाकण शहर व परिसरात अनेक ठिकाणी खड्डे भरण्यासाठी मुरूमाचे ढीग टाकण्यात आले आहेत. परंतु ते अद्याप तसेच पडून आहेत. काही ठिकाणी माती मिश्रित मुरूम टाकण्यात आल्याने पावसामुळे चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. काही भागांत मोठमोठे दगड असलेला मुरूम टाकण्यात आला असून, त्याचे योग्य पद्धतीने सपाटीकरण करण्यात आलेले नाही."

- संतोष लेंडघर, उद्योजक, चाकण.

---

"चाकण मध्ये अनेक दिवसांपासून सांडपाण्याचा प्रश्न कायम आहे. ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी समस्या सोडविण्याच्या सूचना दिल्यानंतरही प्रश्न कायम असल्याने प्रशासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आल्याचे दिसते."

- ॲड. वर्षाताई शेवकरी, नगरसेविका, चाकण.

## शिवनेरीवरील कथित अतिक्रमणांवर सोमय्यांचा इशारा

■ नारायणगाव (दै. संध्या)



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी होत असल्याचा दावा करण्यात आलेल्या कथित अतिक्रमणांविरोधात भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाने सात दिवसांत ठोस कारवाई करावी, अन्यथा हिंदुत्ववादी संघटनांच्या माध्यमातून शिवनेरीच्या पायथ्याशी ठिय्या आंदोलन करण्यात येईल आणि त्यात आपण स्वतः सहभागी होणार असल्याचा इशारा सोमय्या यांनी दिला.

सोमय्या यांनी सोमवारी दि. ७ जुन्नर येथे शिवनेरी गड परिसरातील कथित अतिक्रमणांची पाहणी केली. सुरुवातीला शासकीय विश्रामगृहात महसूल, वन, पुरातत्त्व आणि पोलीस विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांनी संबंधित प्रकरणाची माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी शिवनेरीच्या पायथ्याशी जाऊन कथित अतिक्रमणांची प्रत्यक्ष पाहणी केली.

गडाच्या १०० मीटर परिसरात अतिक्रमण झाल्याचा दावा सोमय्या यांनी केला. यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडे सात तक्रारी दाखल झाल्याचे सांगत, जागा बळकावण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. शिवनेरी परिसरात 'लँड जिहाद' सुरू असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

शिवनेरी हा राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचा परिसर असल्याने येथे बांधकाम आणि विकासकामांसाठी नियम लागू आहेत. मात्र, संबंधित विभागांकडून पुरेसे लक्ष दिले जात नसल्यामुळे कथित अतिक्रमणाला प्रोत्साहन मिळत असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. प्रशासनाच्या भूमिकेबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करत तातडीने चौकशी करून नियमांनुसार कारवाई करण्याची मागणी केली.

दरम्यान, या प्रकरणाबाबत राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन मंत्रालयात विशेष बैठक आयोजित केली जाणार असल्याचेही सोमय्या यांनी सांगितले. शिवनेरी गडाच्या पावित्र्याशी संबंधित विषय असल्याने प्रशासनाने गांभीर्याने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष संतोष नाना खैरे, संघ प्रचारक ॲड. सुनील काळे,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, हर्षवर्धन कुऱ्हे,नंदकुमार तांबोळी, वैभव परदेशी, सुरज खत्री, सचिन खत्री, सागर कुऱ्हे,ऋषिकेश ताजने, प्रशांत ठाकूर,मयूर तुळे, संजय वऱ्हाडी तसेच तहसीलदार रणजीत भोसले, पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्यासह विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कुसूर ग्रामस्थ उपस्थित होते.

## ३६ व्या गांधी दर्शन शिबीरात विविध व्याख्याने संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

स्वतंत्र भारताची परराष्ट्र नीती ही आमची स्वतः ची असेल. त्या वेळी सोव्हिएत गट आणि अमेरिकेचा गट प्रभावी होता. अशा वेळी पंतप्रधान पं. नेहरूंनी अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले. ही फार महत्त्वाची बाब होती. असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक शंकर निकम यांनी 'पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण' या विषयावर बोलताना केले. गांधीभवन येथे झालेल्या ३६ व्या गांधीदर्शन शिबिरात ते बोलत होते. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विश्वस्त एम.एस. जाधव , प्रा. प्रवीण सप्तर्षी, प्रा प्रमोद वागदरीकर हे मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते

शंकर निकम म्हणाले की, कुठल्याही गटात जाणे देशाला परवडणारे नव्हते. पश्चिमेकडील देश अमेरिकेला आणि पूर्वेकडील देश सोव्हिएतला असे वाटले गेले होते. मात्र दक्षिण गोलार्धातील देश स्वतंत्र होत होते ते देश पुन्हा उत्तर गोलार्धातील देशांच्या कह्यात जाऊ नये असा पं. नेहरूंचा हेतू होता. अन ती जागल्या ची भूमिका पं. नेहरू पार पाडत होते. पं. नेहरूंच्या 'पंचशील' मध्ये सर्वांना सामुहिक सहजीवनाची संकल्पना मांडली गेली होती. कुठल्याही गटात सामील न होता अलिप्ततावादी देशांची मोठी ताकद पं. नेहरूंनी जगात उभी केली हे फार मोठे योगदान होते असे निकम यांनी सांगितले. ते म्हणाले की भारत स्वतंत्र झाल्यावर जगाला अणुयुद्ध/शीत युद्धातून बाहेर काढण्यासाठी एकच एक आशेचा नंदादीप होता. तो म्हणजे पं. नेहरू! पं. नेहरू यांच्या निधनानंतरही त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने जग चालत राहिले. जगातील अनेक देशांशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी पं. नेहरूंनी मोठी भूमिका सदैव निभावली. अशा या महान जागतिक नेत्याबद्दल प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे असे ते म्हणाले. या शिबिरात दुसरे पुष्प 'शिक्षण आणि शाळा' या विषयावर आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांनी गुंफले. ते म्हणाले की, समाजात काही चुकीचं घडत असेल तर ते दुरुस्त करणे हे शाळेतच शक्य आहे.

## अमेरिका, रशिया आणि केनिया येथील शिष्टमंडळाचा पीसीइटी ट्रस्ट मध्ये शैक्षणिक दौरा संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभव, उच्च शिक्षण व संशोधन, रोजगार संधी व करिअरसाठी मार्गदर्शन मिळण्यासाठी परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांशी संवाद वाढविला पाहिजे. या उद्देशाने पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या निगडी येथील कार्यालयात अमेरिका, रशिया आणि केनिया येथील शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. या शैक्षणिक दौऱ्यात सहभागी झालेल्या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी स्वागत केले. यावेळी ट्रस्टच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आदी उपस्थित होते.

या शिष्टमंडळात मनरो युनिव्हर्सिटी अमेरिकाचे आग्नेय आशिया ऑपरेशन्स सहाय्यक संचालक आशा अलोशियस, इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अमेरिका स्टुडंट सक्सेस ॲडव्हायझर रोचेस्टर विंचो चौहाई, आंतरराष्ट्रीय संबंध विभाग कझान इनोव्हेटिव्ह युनिव्हर्सिटी रशिया चे डेनिस कीको, युनिव्हर्सिटी रिलेशन्स ऑफिसर सेंट लुईस युनिव्हर्सिटी अमेरिका अभिनव भारद्वाज, प्रादेशिक प्रतिनिधी मिडवे युनिव्हर्सिटी अमेरिका रजत कुशवाह, शाळा समुपदेशक लाइट अकादमी केनिया चे पॉल, उपाध्यक्ष आंतरराष्ट्रीय ऑपरेशन्स स्टडी मेट्रो अभिनव बजाज, प्रादेशिक संचालक स्टडी मेट्रो राज कपूर, पंकज चव्हाण आदींचा समावेश होता.



## धाराशिवचे जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य सचिव व गृह सचिव यांना बजावली 'न्यायालयाच्या अवमाननेची नोटीस'

■ पुणे (दै. संध्या)



श्री तुळजाभवानी मंदिरात भक्तांनी अर्पण केलेले तब्बल २४७ किलो सोने आणि ३२९८ किलो चांदी वितळवण्याचा नव्याने ठराव करून मंदिर प्रशासनाने राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे मंजुरी मागितली आहे. प्रशासन दावा आहे की, ते केवळ २००९ नंतरचे सोने वितळवणार आहेत; मात्र प्रशासनाचा हा दावा चुकीचा व न्यायालयाची दिशाभूल करणारा आहे. उच्च न्यायालयाने २३ जानेवारी २०२५ रोजीच प्रशासनाची २००९ नंतरचे सोने वितळवण्याची याचिका फेटाळून लावली होती. तरीही नव्याने ठराव करून शासनाकडे परवानगी मागणे, हा न्यायालयाचा थेट अवमान आहे. या संदर्भात 'हिंदु जनजागृती समिती'च्या वतीने अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगांवकर यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य सचिव, गृह सचिव आणि विधी व न्याय विभागाचे सचिव यांना 'न्यायालयाच्या अवमाननेची नोटीस' बजावली असून प्रशासनाला 'क्रिमिनल कंटेम्प्ट'चा (फौजदारी अवमान) इशारा दिला आहे. दिनांक ०१.०१.२०१० ते १०.०६.२०२३ या काळातील सोने वितळवण्याच्या परवानगीसाठी संस्थानाने उच्च न्यायालयात अर्ज केला होता. मात्र २३ जानेवारी २०२५ रोजी न्यायालयाने स्पष्ट केले की, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने अंतरिम आदेशात बदल करणे अयोग्य ठरेल. असे असताना पुन्हा नवा ठराव करणे बेकायदेशीर आहे. दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी उच्च न्यायालयाने सोन वितळवण्यावर स्थगिती देतांना एका गंभीर बाबीची दखल घेत नमूद केले होते की, "एका भक्ताने अर्पण केलेला सोन्याचा मुकुट हा खोटा (सोन्यासारखा दिसणारा) निघाला आहे." मंदिरातून प्राचीन ७१ नाणी, सोन्याचा मुकुट आणि मंगळसूत्र आधीच गायब आहे. जर खजिन्यातील दागिने खोटे निघत असतील, तर तिथे चोरी झाली आहे हे स्पष्ट होते. आता उर्वरित सोने वितळवल्यास 'खोटे दागिने कुणी ठेवले?' याचा पुरावा नष्ट होईल आणि हा भ्रष्टाचार दडपला जाईल. प्रशासन असा दावा करत आहे की, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाला स्थगिती दिली आहे, मात्र नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती ही केवळ ८.५० कोटींच्या अपहार प्रकरणातील १६ दोषींवर 'गुन्हे दाखल करण्यापुरती' मर्यादित आहे. या स्थगितीचा 'सोने वितळवण्याच्या परवानगीशी' कोणताही संबंध नाही. सोने वितळवण्यावर उच्च न्यायालयाची आधीची स्थगिती आजही कायम आहे. जर जिल्हा प्रशासनाने हा सोने वितळवण्याचा बेकायदेशीर ठराव तातडीने मागे घेतला नाही, तर धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर त्यांच्या वैयक्तिक क्षमतेत 'फौजदारी अवमान याचिका' दाखल केली जाईल.

# आधुनिक साहित्याच्या दृष्टिकोनातून कृष्णचरित्राचा उलगडा

■ पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, सहज कलात्मक फाउंडेशन आणि एमआयटी स्कूल ऑफ ड्रामा, एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदोत्सव २०२६' अंतर्गत 'आधुनिक साहित्यात कृष्ण' या विषयावर साहित्यिक चर्चा आणि नाट्यप्रस्तुतीचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठातील राज कपूर सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाला सहज कलात्मक फाउंडेशनचे अध्यक्ष अरुण शेखर, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे सहसंचालक सचिन निंबाळकर, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ.नचिकेत ठाकूर आणि एमआयटी स्कूल ऑफ ड्रामाचे विभागप्रमुख डॉ. अमोल देशमुख यांच्यासह साहित्य, कला आणि रंगभूमी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात 'आधुनिक साहित्यात कृष्ण' या विषयावर डॉ. सुनील देवधर आणि समीक्षा तेलंग यांनी विचार मांडले. आधुनिक साहित्यामध्ये भगवान कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, त्यांची समकालीन संदर्भातील उपयुक्तता तसेच साहित्यिक अभिव्यक्ती यावर चर्चा करण्यात आली. यानंतर अरुण शेखर लिखीत व एन.के.पंत यांचे दिग्दर्शन आणि मिलिंद त्रिवेदी यांनी संगित दिलेल्या 'सुनो कन्हैया' या नाट्यप्रस्तुतीचे सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून हिंदी साहित्य, रंगभूमी आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेतील कृष्णविचार यांचा समकालीन दृष्टिकोनातून वेध घेण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला होता.

## थोडक्यात पण महत्वाचे




### न्यू इंग्लिश स्कूल गोजुबावी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**गोजुबावी : दैनिक संध्या**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दि.२८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत विद्यालयात विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी श्री.किशोर भोसले,सौ.मनीषा वीरकर व सौ.प्रीतम पानसरे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कबड्डी,खो-खो,सायकलिंग,लंगडी आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपले क्रीडा कौशल्य दाखविले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड,संघभावना,शिस्त, नेतृत्वगुण व खिलाडूवृत्ती विकसित होण्यास मदत झाली.संपूर्ण क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती नानासाहेब आबनावे बिनविरोध



**पुणे : दैनिक संध्या**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदी नानासाहेब आबनावे यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर नानासाहेब आबनावे यांनी सभापती प्रकाश जगताप आणि संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले. बाजार समितीच्या विकासासाठी सर्व संचालकांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. बाजार समितीच्या कामकाजात समन्वय साधून शेतकरी व्यापारी आणि बाजार समितीशी संबंधित घटकांच्या हिताला प्राधान्य देणार असल्याचे आबनावे यांनी सांगितले. विकासाभिमुख भूमिका घेऊन बाजार समितीच्या प्रगतीला हातभार लावण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी सभापती प्रकाश जगताप, माजी सभापती दिलीप काळभोर, संचालक राजाराम कांचन, गणेश घुले, प्रशांत काळभोर, नितीन दांगट, दत्तात्रय पायगुडे, सुदर्शन चौधरी, लक्ष्मण केसकर, सारिका हरगुडे, मनीषा हरपळे, रवींद्र कंद, संतोष नांगरे, यांच्यासह चंद्रकांत वारघडे,मिलिंद हरगुडे, ईश्वर गाडुते, संदेश आव्हाळे, राजेंद्र खांदवे, नवनाथ काकडे आदी उपस्थित होते.

### गर्भलिंग निदान प्रकरण; मुख्य आरोपीच्या पतीस अटक, ११ सप्टेंबरपर्यंत कोठडी

**यवत : दैनिक संध्या**

बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणाच्या तपासात यवत पोलीस ठाण्याच्या विशेष तपास पथकाने (SIT) मोठी कारवाई केली आहे. मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी याची पत्नी राणी अण्णासाहेब गिरी हिचा या प्रकरणातील प्रत्यक्ष सहभाग तपासात निष्पन्न झाल्यानंतर तिला ८ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने तिला ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यवत पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४६६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ८८, ९१, ३(५) व इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार या गंभीर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सखोल व तांत्रिक पद्धतीने सुरू आहे. तपासादरम्यान बेकायदेशीर गर्भलिंग निदानातून मिळणारी रक्कम राणी गिरी हिच्या वैयक्तिक बँक खात्यावर जमा होत असल्याचे, तसेच इतर आरोपींच्या खात्यांमधूनही गुन्ह्यातील रकमेचे हस्तांतरण झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. दरम्यान, या प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेले डॉ. सुमंत तुकाराम शितोळे, बापूराव जांभळे आणि सचिन कदम यांनी सत्र न्यायालय, बारामती येथे जामिनासाठी अर्ज दाखल केले होते. सुनावणीदरम्यान तपासी अधिकाऱ्यांनी आरोपींविरुद्धचे सबळ व तांत्रिक पुरावे न्यायालयासमोर मांडले. त्यानंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले आहेत. तसेच, या गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी डॉ. मंदार सुरेश माळी याने अटकेपासून बचाव करण्यासाठी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्जही सत्र न्यायालय, बारामती यांनी यापूर्वीच फेटाळला आहे. या प्रकरणाचा पुढील सखोल व विधिग्राह्य तपास विशेष तपास पथकाकडून सुरू असल्याची माहिती यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तथा SIT तपासी अधिकारी संतोष तासगावकर यांनी दिली आहे.




### रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा

**वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या**

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन महिला दक्षता समिती व प्रगती बहुउद्देशीय सामाजिक संस्था,वाघळवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस अधिकारी व अंमलदार,सेवानिवृत्त आर्मी मेजर व पत्रकार बांधवांचा रक्षाबंधन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी महिला पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित मान्यवरांचे औक्षण करून राखी बांधत त्यांच्या देशसेवा,समाजसेवा,सुरक्षा व जनजागृतीतील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. रक्षाबंधनाच्या माध्यमातून सुरक्षा, बंधुभाव,सामाजिक सलोखा आणि पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देण्यात आला.कार्यक्रमावेळी पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी, माजी आर्मी सैनिक,पत्रकार बांधव,महिला दक्षता समिती अध्यक्षा सुचिता जगन्नाथ साळवे, स्मिता दिलीप भोसले,अनिता बनकर,खुर्शिदा मुलानी,शोभा जगताप,सुनिता गायकवाड,ज्योती कुटे यांसह महिला भगिनी उपस्थित होत्या.

# सासवड येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**■ सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी अँड पॉली, सासवड येथे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ७ सप्टेंबर २०२६ रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, पॉलिटेक्निक विभागाच्या प्राचार्या प्राध्यापक विशाखा गायकवाड, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक मा. बाबुरावजी घोलप साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर रांगोळी स्पर्धेच्या परीक्षणास सुरुवात करण्यात आली. स्पर्धेसाठी शिक्षणाचे भविष्य : पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, मा. बाबुरावजी घोलप साहेब आणि मा. अजितदादा पवार साहेब' हा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक कौशल्याचा व सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार रांगोळीच्या माध्यमातून साकारला. रंग, कल्पकता, सामाजिक संदेश आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा सुंदर संगम साधणाऱ्या विविध रांगोळ्यांनी परिसर आकर्षक व उत्साहपूर्ण बनला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. प्राध्यापक पूजा पिसाळ यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. संस्थेच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीचा गौरव करणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळाले, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## मदर तेरेसा फाउंडेशनच्यावतीने माता वेलंकनी यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**■ पुणे (दै. संध्या)**

पुणे पुलगेट सोलापूर बाजार येथे ख्रिश्चन बांधव वास्तव्यात आहेत नऊ दिवसांची प्रार्थना पूर्ण करून माता वेलंकनी यांचा जन्मोत्सव सोहळा मदर तेरेसा फाउंडेशनच्या वतीने अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. आरोग्यदाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेलंकनी मातेच्या जयंतीनिमित्त नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम घेत दहाव्या दिवशी सोलापूर बाजार पुलगेट मार्गे विविध ठिकाणी मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीमध्ये ख्रिस्ती बांधवांसहित इतर जाती-धर्मातील भाविक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. सोलापूर बाजार परिसरात माता वेलंकनी यांच्या भोवती मेणबत्ती,रांगोळी व हारफुलांनी सजावट करण्यात आली होती. यावेळी भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक सेंट



मदर तेरेसा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बबलू अँथोनी रॉयल यांनी केले तसेच यावेळी स्थानिक चर्चे फादर रॉक, फादर विल्यम, ऍडव्हड जेकब, फ्रान्सिस जेकब, रिबोलो जेकब, जेसिंता रॉयल, न्यानंसि जेकब, स्टेला जेकब, यांच्यासह स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दंगलकार नितीन चंदनशिवेंच्या प्रबोधनात्मक व्याख्यानाला उस्फुर्त प्रतिसाद

**■ बारामती (दै. संध्या)**

बारामती येथे कालकथित झुंबरलाल अहिवळे,कालकथित नानुबाई अहिवळे आणि कालकथित उषाताई अहिवळे यांच्या संयुक्त स्मृतिदिनानिमित्त मानव एकता युवक संघटना,शेरसुहास मित्र मंडळ आणि भारतदादा अहिवळे युवा शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दुपारी १२ वाजता बुद्ध पूजापाठ व अन्नदानाचा कार्यक्रम आणि सांय ७ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते आणि विद्रोही कवी नितीन चंदनशिवे यांच्या प्रबोधनात्मक व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.या दोन्ही कार्यक्रमाला बारामती तालुका आणि परिसरातील नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिल्याचे पहायला मिळाले. व्याख्याते नितीन चंदनशिवे यांनी आपल्या खास वकृत्वशैलीत विविध विषयांवर चौफेर फटकेबाजी केली.तसेच अनुसूचित जातीतील उपवर्गिकरणाच्या विषयांवर भाष्य करत.त्यांनी उपवर्गिकरणाच्या षडयंत्राचा पर्दाफाश करून दोन्ही समाजाला संयम राखण्याचे आवाहन केले.सोबतच शिक्षण ही काळाची गरज असून कोणत्या ही परिस्थितीत पालकांनी आपल्या मुलांना शिकवलच पाहिजे असा संदेश देखील त्यांनी दिला. याप्रसंगी शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला पवार,भारतीय दलित कोब्राचे अध्यक्ष ॲड.भाई विवेक चव्हाण,भारत मुक्ती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष सचिन बनसोडे,माजी नगराध्यक्ष सदाशिव सातव, कैलास चव्हाण,शेतकरी संघटनेचे राजेंद्र ढवाण पाटील,किशोर शिवरकर,नथुराम हाटे,आनंद थोरात,तैनूर शेख,ॲड.करीम बागवान यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. सुशिल अहिवळे, शुभम अहिवळे, सिद्धार्थ लोंढे, संतोष लोंढे, नितीन गव्हाळे, सुरज अहिवळे, प्रा. रमेश मोरे, नानासाहेब साळवे,संजय शिंदे, रितेश गायकवाड, अमोल रणदिवे, किरण अहिवळे, भारत बगाडे,दिवेश अहिवळे, मुकेश अहिवळे, मनोज शिंदे, दत्तात्रय रणदिवे, सोमनाथ कदम, शेखर अहिवळे, विशाल घोडके यांनी परिश्रम घेतले.

# बारामतीतील महिला शिक्षिकेचा संशयास्पद मृत्यू

- चिठ्ठीत 'माझ्या मृत्यूस कोणालाही जबाबदार धरू नये' असा उल्लेख
- जळोचीतील श्रीरामनगर परिसरातील घटना
- मृत्यूमागील कारणांचा पोलीसांकडून तपास सुरू

**■ बारामती (दै. संध्या)**

शहरातील महिलांच्या आत्महत्येचे सत्र थांबत नसून एका शिक्षीकेने सोमवारी (ता. 7) राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.या बाबत शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून तपास सुरु केला आहे.सोनाली दिलीपकुमार ठोंबरे (वय ३९,रा.श्रीरामनगर लेन क्रमांक १,जळोची,ता.बारामती) असे मृत महिलेचे नाव आहे. जळोची येथील श्रीरामनगर परिसरात ही घटना घडली.मृत महिला बारामती नगर परिषद शाळा क्रमांक ५ येथे शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. सोनाली दिलीपकुमार ठोंबरे (वय ३९, रा.श्रीरामनगर,लेन क्रमांक १, जळोची,ता. बारामती) असे मृत शिक्षिकेचे नाव आहे.या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रासह बारामती शहरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,सोमवारी सकाळी सुमारे आठच्या सुमारास सोनाली ठोंबरे या त्यांच्या राहत्या घरात बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्या. प्रकार लक्षात आल्यानंतर नागरिक व नातेवाईकांच्या मदतीने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र,वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती मिळताच बारामती शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृत महिलेचे बंधू महावीर उत्तम ठोंबरे (वय ५७,रा.बोरी, ता.इंदापूर,सध्या रुईपाटी,ता. बारामती) यांनी पोलिसांना याबाबत खबर दिली.त्यानुसार बारामती शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान,पोलिसांच्या प्राथमिक तपासादरम्यान एक चिठ्ठी आढळून आल्याची माहिती समोर आली आहे.या चिठ्ठीत आपल्या मुलांची काळजी घेण्याची भावनिक विनंती करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.तसेच मुलांची योग्य प्रकारे काळजी घ्यावी,त्यांना एकटे सोडू नये,अशा आशयाचा उल्लेख असल्याची माहिती आहे. आपल्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरू नये,असाही उल्लेख चिठ्ठीत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. मात्र,या चिठ्ठीची सत्यता, त्यातील मजकूर आणि घटनेशी संबंधित इतर सर्व बाबींची पोलिसांकडून पडताळणी करण्यात येत आहे.

**मृत्यूमागील नेमके कारण काय?**

सोनाली ठोंबरे यांच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून घटनास्थळावरील परिस्थिती, उपलब्ध कागदपत्रे,चिठ्ठी तसेच कुटुंबीय व संबंधित व्यक्तींची माहिती घेऊन तपास करण्यात येत आहे.त्यामुळे कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी पोलिसांच्या तपासाचा निष्कर्ष महत्त्वाचा ठरणार आहे.

**महिलांच्या आत्महत्यांच्या घटनांबाबत चिंता**

बारामती शहर व परिसरात गेल्या काही काळात महिलांच्या आत्महत्यांच्या घटना समोर आल्याने सामाजिक स्तरावर चिंता व्यक्त होत आहे.अल्पावधीत अशा घटनांची पुनरावृत्ती होत असल्याने महिलांवरील मानसिक ताण, कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती तसेच उपलब्ध समुपदेशन व्यवस्था याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान,सोनाली ठोंबरे यांच्या मृत्यूच्या घटनेचा पुढील तपास बारामती शहर पोलीस करीत असून मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेशी संबंधित सर्व बाबी तपासानंतर स्पष्ट होणार आहेत.

# लोणी काळभोर येथे राधाकृष्ण मंदिर कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न



**■ लोणी काळभोर (दै. संध्या)**

लोणी काळभोर येथील राधाकृष्ण मंदिरात कलशारोहण तसेच श्री राधाकृष्ण मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा, मंत्रोच्चार आणि भक्तिगीतांनी वातावरण मंगलमय झाले होते.

कलशारोहणवमूर्तीप्राणप्रतिष्ठापनेच्या मुख्य विधींना भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. विधीवत पूजा-अर्चा करून श्री राधाकृष्णांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर मंदिराच्या शिखरावर विधीपूर्वक कलशारोहण करण्यात आले.या सोहळ्यानिमित्त मंदिर परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. परिसरातील नागरिक, भाविक तसेच महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

या धार्मिक सोहळ्या निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हभप गुरुवर्य बालब्रह्मचारी पंडित महाराज नागरगोजे (देवाची आळंदी) यांच्या शुभहस्ते मंदिराचे कलशारोहण करण्यात आला .मूर्ती प्राणप्रतिष्ठापना शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या हस्ते करण्यात आली .आणि राजस्थानी भवनचे उदघाटन माजी आमदार अशोक पवार यांच्या हस्ते पार पडले . या सोहळ्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य विलास काळभोर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

शुक्रवार दिनांक ४सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते ९.३० या वेळेत गजाननजी, राधाकृष्णाची मूर्ती व कलश यांची मिरवणूक काढण्यात आली . दुपारी १२.३९ वाजता मूर्तींची प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व ध्वजारोहण करण्यात आले . रात्री १० ते १२.३० दरम्यान श्रीकृष्ण जन्माष्टमी व गायक पुरुषोत्तम सिंगी व रवीराज शर्मा यांच्या संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. शनिवार दि ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ४ पर्यंत श्री राधाकृष्णजी प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले .या सोहळ्याचे नियोजन राजस्थानी युवा संघ, राजस्थानी महिला मंडळ आणि समस्त ग्रामस्थ लोणी काळभोर, कदम वाकवस्ती यांच्या वतीने करण्यात आले.

# ग्रामीण शिक्षणपद्धतीची दखल घेत इन्सुली शाळेचा सन्मान

**इन्सुली नं. ५ पागावाडी जि.प. शाळेत जनजागृती सेवा संस्थेतर्फे शिक्षकांचा गौरव**

**■ सावंतवाडी (दै. संध्या)**

"ग्रामीण भागातील शाळांमध्ये आजही शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता विविध उपक्रम राबवितात. मर्यादित साधनसामग्रीतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या शिक्षकांच्या कार्याची समाजाने दखल घेणे गरजेचे आहे. ग्रामीण शाळांमधील ही शिक्षणपद्धती आणि शिक्षकांची तळमळ समाजासमोर यावी, यासाठीच जनजागृती सेवा संस्थेने ग्रामीण भागातील शाळांची निवड करून शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम सुरू केला आहे," असे प्रतिपादन जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी इन्सुली येथे केले.

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा इन्सुली नं. ५ पागावाडी येथे जनजागृती सेवा संस्थेतर्फे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक



कार्याची दखल घेत विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक भास्कर रामा माजगावकर, उपशिक्षक सुधीर राजाराम गावडे व हंसराज व्यंकटराव गवळे यांचा सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागातील शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मर्यादित सुविधा, स्थानिक परिस्थिती आणि विद्यार्थ्यांची विविध शैक्षणिक पार्श्वभूमी यांचा विचार करून शिक्षकांना अध्यापनाच्या विविध पद्धतींचा अवलंब करावा लागतो. अशा परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारे शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी काम करीत आहेत. याच कार्याची दखल घेऊन संस्थेने इन्सुली नं. ५ पागावाडी शाळेची निवड केली. 'ग्रामीण शाळा ही केवळ शिक्षणाची नव्हे, तर संस्कारांची केंद्रे' यावेळी रश्मी मुसळे साळगावकर म्हणाल्या, "ग्रामीण शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि स्थानिक संस्कृतीची ओळख दिली जाते. शिक्षक विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने जोडलेले असतात. त्यामुळे ग्रामीण शाळांमधील शिक्षणपद्धतीचे आणि शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक होणे आवश्यक आहे. अशा सन्मानातून शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळते." मुख्याध्यापक भास्कर माजगावकर यांनी संस्थेचे आभार मानताना सांगितले की, "शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेपुरते तयार करणे हा आमचा उद्देश नसून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. ग्रामीण भागातील शाळेतील शिक्षकांच्या कामाची दखल घेऊन जनजागृती सेवा संस्थेने केलेला हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांसाठी आणखी चांगले काम करण्याची जबाबदारी वाढली आहे.

उपशिक्षक सुधीर गावडे व हंसराज गवळे यांनीही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नसून योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, असे त्यांनी सांगितले. या सन्मान सोहळ्यास पत्रकार नीलेश मोरजकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, पालक विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी जनजागृती सेवा संस्थेने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, ग्रामीण शिक्षणव्यवस्थेतील सकारात्मक काम समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सचिव सौ.संचिता भंडारी आणि खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.